


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १५० * नांदेड * शनिवार, दि. ६ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे ८ योजनांमध्ये सवलती

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी राज्य सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनानं घेतला आहे.

शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल ८ विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे मराठा समाजातील



हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

ओबीसींप्रमाणे मराठा समाजाला मिळणाऱ्या ८ प्रमुख सवलतींमध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना आता मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांनाही लागू होईल. मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात येणार आहे. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली विशेष शिष्यवृत्ती योजना मराठा प्रवर्गासाठी विस्तारित करण्यात आली आहे. यासह अन्य योजनांमध्ये सवलती मिळणार आहेत.

**मराठा आरक्षण आंदोलनातील मृतांच्या वारसांना मदत जाहीर**


मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# नांदेड तालुक्यातील ६५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ९ जूनपासून सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील एकूण ६५ ग्रामपंचायतींच्या मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, यांचे आदेश क्रमांक रानिआ/ग्रापनि२०२५प्र.क्रं.४/ का-८ दि. २५ मे २०२६ आणि पत्र दिनांक २६ मे २०२६ व जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र २६ मे २०२६ अन्वये बिगर व अंशतः अनूसुचित क्षेत्रातील सन २०२४, २०२५ मध्ये मुदत संपलेल्या आणि सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या व नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.

या आरक्षण निश्चितीसाठी संबंधित ग्रामपंचायतींच्या कार्यालयांमध्ये दिनांक ९ जून २०२६ ते ११ जून २०२६ या कालावधीत सकाळी ९ वा. आणि दुपारी ३ वा. विशेष ग्रामसभेचे आयोजन प्राधिकृत अधिकाऱ्याच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

यामध्ये मंगळवार, दि.९ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता : खडकुत/ऐमशेटवाडी, नसरतपुर/हस्सापूर, सोमेश्वर, पुणेगाव, आलेगाव, वडवणा/खडकी खुरगाव,फत्तेपुर/इलीचपूर, बोरगांव तेलंग, नेरली, दुपारी ३ वाजता : बोंढार तर्फे हवेली, पुयनी, नाळेश्वर, पिंपळगाव मि., निळा, तळणी, नांदुसा/भालकी, इंजेगाव, पिंपळगाव कोरका, चिखली खु. **(पान ६ वर...)**




# शहराच्या वजिराबाद भागात माय-लेकीचा संशयास्पद मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद भागात राहणाऱ्या माय-लेकीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार, दि.५ जून रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

वजिराबाद भागातील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पाठीमागे काजल विजय जाधव (वय ३२) ह्या आपली मुलगी विशाखा (वय १२) हिच्यासोबत राहत्या होत्या. काजल जाधव ह्या कौठा भागातील यशोसाई हॉस्पीटलमध्ये परिचारिका म्हणून काम करीत असत. गेल्या काही वर्षांपासून पतीपासून त्या विभक्त राहत असत. शुक्रवारी सकाळी काजल जाधव व विशाखा या दोघी माय-लेकी घराबाहेर पडल्या नाहीत. शेजारी राहणाऱ्यांनी घराबाहेरुन आवाज दिला. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शेजारी एकत्र जमा झाले. त्यांनी घराचा दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला. तेव्हा दोघीही आई व मुलगी झोपलेल्या अवस्थेत आढळून आल्या. शेजाऱ्यांनी त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु माय-लेकीचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती वजिराबाद पोलीस स्टेशनला देण्यात आली. तात्काळ पोलीस अधिकारी व कर्मचारी रुग्णालयात दाखल झाले. दोघींचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. आई व मुलीच्या संशयास्पद मृत्यूमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# नांदेडमार्गे हैदराबाद-जयपूर साप्ताहिक एक्स्प्रेसची सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** तेलंगणा, महाराष्ट्र आणि राजस्थान राज्यांदरम्यान रेल्वे संपर्क अधिक मजबूत करण्याच्या दिशेने हैदराबाद-जयपूर-हैदराबाद साप्ताहिक एक्स्प्रेस सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. ही गाडी सध्या चालवल्या जाणाऱ्या हैदराबाद-जयपूर-हैदराबाद साप्ताहिक टीओडी विशेष गाडीचे नियमितीकरण म्हणून चालविण्यात येणार आहे.

या नव्या साप्ताहिक एक्स्प्रेसमुळे तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थान दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. तसेच या मार्गावरील महत्त्वाच्या व्यावसायिक, शैक्षणिक, धार्मिक



आणि पर्यटन स्थळांना उत्तम रेल्वे संपर्क मिळणार आहे.

गाडी क्र. १७०७९ हैदराबाद-जयपूर साप्ताहिक एक्स्प्रेस ही २४ जुलै २०२६ पासून सुरू होणार असून, दर शुक्रवारी हैदराबाद येथून सायं. ७.५० वाजता सुटून रविवारी सकाळी ५.२५ वाजता जयपूर येथे पोहोचेल.

गाडी क्र. १७०८० जयपूर-हैदराबाद साप्ताहिक एक्स्प्रेस ही २६ जुलै २०२६ पासून सुरू होणार असून, दर रविवारी जयपूर येथून दुपारी ३.३० वाजता सुटून मंगळवारी सकाळी ५ वाजता हैदराबाद येथे पोहोचेल.

ही गाडी सिकंदराबाद जंक्शन, कामारेड्डी, निजामाबाद जंक्शन, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापूर, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, उज्जैन, रतलाम, मंदसौर, नीमच,चित्तौडगड जंक्शन, भिलवाडा, बिजयनगर, अजमेर जंक्शन, किशनगढ, फुलेरा, जयपूर जंक्शन या स्थानकांवर थांबणार आहे.

या गाडीत एकूण २२ एलएचबी डबे असतील. त्यामध्ये २ वातानुकूलित द्वितीय श्रेणी (एसी २- टिअर) डबे, ७ वातानुकूलित तृतीय श्रेणी (एसी ३- टिअर) डबे, ७ शयनयान डबे, ४ सामान्य द्वितीय श्रेणी डबे, १ सामान व ब्रेक व्हॅन, १ सामान-सह-गार्ड-सह-जनरेटर डबा असणार आहे.

# नांदेड जिल्ह्यासाठी ८ जून रोजी येलो अलर्ट

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. ५ जून २०२६ रोजी दुपारी १२:३८ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. ८ जून २०२६ या दिवसासाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# सरकारी शाळा आणि हरवत चाललेले बालपण

राज्यातील सरकारी शाळांमधील पहिलीच्या विद्यार्थ्यांची सतत घटणारी पटसंख्या ही केवळ शिक्षण विभागाची आकडेवारी नाही, तर ती समाजाच्या बदलत्या वास्तवाची गंभीर घंटा आहे. मागील तीन वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये दरवर्षी हजारोंच्या संख्येने विद्यार्थी कमी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. २०२२-२३ मध्ये पहिलीतील विद्यार्थ्यांची संख्या ८ लाख १५ हजार होती, ती २०२५-२६ मध्ये घटून ६ लाख ७७ हजारांवर आली आहे. म्हणजेच अवघ्या काही वर्षांत लाखभर विद्यार्थ्यांची घट झाली आहे. हे वास्तव राज्याच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभे ठाकलेले मोठे आव्हान आहे. शिक्षण विभागाने १०० टक्के पटनोंदणीचे उद्दिष्ट ठेवले असले तरी प्रश्न केवळ विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याचा नाही, तर त्यांना शाळेत टिकवण्याचाही आहे. मोफत पुस्तके, गणवेश, बूट, मध्यान्ह भोजन अशा अनेक सुविधा सरकार देत आहे. तरीही पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास कमी होत चालला आहे. यामागे केवळ जन्मदर घटणे हे एकमेव कारण नाही. सरकारी शाळांची गुणवत्ता, शिक्षकांची कमतरता, इंग्रजी माध्यमाची वाढती आकर्षणशक्ती आणि त्यांनी मांडलेला शिक्षणाचा बाजार याही कारणांचा गांभीर्याने विचार करावा लागेल. त्यात पुन्हा खाजगी शिकवणी वर्गाच्या लोकांनी केलेला नीट पेपरचा घोटाळा हा शिक्षण व्यवस्थेवर कधी न मिटणारा डाग देऊन गेला आहे. आज ग्रामीण भागातील अनेक पालक अत्यंत कष्ट करूनही मुलांना खासगी शाळेत पाठवण्याचा प्रयत्न करतात. कारण सरकारी शाळा म्हणजे दर्जाहीन शिक्षण अशी प्रतिमा समाजात तयार झाली आहे. काही ठिकाणी शिक्षकांची कमतरता, अपुरी इमारत, डिजिटल साधनांचा अभाव आणि शैक्षणिक वातावरणातील मरगळ यामुळे पालक सरकारी शाळांकडे पाठ फिरवत आहेत. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. कारण गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सरकारी शाळाच शिक्षणाचा मुख्य आधार असतो. याहून गंभीर बाब म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली मानसिक आणि शैक्षणिक घसरण. आजची मुले मोबाईल, सोशल मीडिया आणि मनोरंजनाच्या आभासी जगात अधिक गुंतत चालली आहेत. अभ्यासावरील एकाग्रता कमी होत आहे. वाचनाची सवय संपत चालली आहे. अनेक विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावरच वाचन, लेखन आणि गणितातील मूलभूत कौशल्ये आत्मसात करता येत नाहीत. शिक्षण केवळ परीक्षा आणि गुणांपुरते मर्यादित राहिले आहे. संस्कार, सामाजिक जबाबदारी आणि व्यक्तिमत्त्व विकास या गोष्टी दुय्यम ठरत आहेत. ग्रामीण भागात तर परिस्थिती अधिक बिकट आहे. अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडतात. काहींना लहान वयातच कामावर जावे लागते. काही ठिकाणी स्थलांतरित मजुरांच्या मुलांचे शिक्षण खंडित होते. मुलींच्या शिक्षणातही अनेक सामाजिक अडथळे अजून कायम आहेत. परिणामी, शिक्षणाचा पाया कमकुवत होत चालला आहे. सरकारी शाळा वाचवण्यासाठी केवळ पटनोंदणी मोहिमा पुरेशा ठरणार नाहीत. शिक्षणाच्या गुणवत्तेत आमूलाग्र बदल करणे गरजेचे आहे. सर्वप्रथम प्राथमिक शिक्षण अधिक आकर्षक आणि व्यवहार्य बनवावे लागेल. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रयोग, खेळ, कला, विज्ञान, वाचन आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला पाहिजे. शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षक, डिजिटल सुविधा आणि चांगले शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. पालकांमध्ये सरकारी शाळांविषयी विश्वास निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकांनी नियमित पालक संपर्क वाढवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे त्यांनी आपला अवांतर अभ्यास वाढवून विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञान देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गावपातळीवर शिक्षण समित्या अधिक सक्रिय व्हायला हव्यात. प्रत्येक गावाने माझी शाळा, माझी जबाबदारी ही भावना स्वीकारली पाहिजे. लोकप्रतिनिधींनीही फक्त उद्घाटने करण्यापुरते मर्यादित न राहता शाळांच्या गुणवत्तेकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांची घसरण थांबवण्यासाठी मानसिक आरोग्य, समुपदेशन आणि मूल्यशिक्षणालाही महत्त्व द्यावे लागेल. आजच्या मुलांना योग्य दिशा देणारे वातावरण आवश्यक आहे. शिक्षक, पालक आणि समाज या तिघांनी मिळून मुलांमध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा आणि सकारात्मकता निर्माण करणे गरजेचे आहे. शाळा रिकाम्या होणे म्हणजे भविष्यातील समाज रिकामा होण्याची सुरुवात आहे. सरकारी शाळा केवळ शिक्षण संस्था नसून सामाजिक समतेचा पाया आहेत. त्या वाचल्या तरच ग्रामीण आणि गरीब समाजातील लाखो मुलांचे भविष्य सुरक्षित राहील. अन्यथा शिक्षणातील दरी आणखी वाढेल आणि समाजातील विषमता अधिक तीव्र होईल. त्यामुळे ही केवळ शिक्षण विभागाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

# शिवराज्याभिषेक : स्वराज्याच्या सार्वभौमतेचा सुवर्णक्षण

भारतीय इतिहासात काही घटना अशा आहेत की, ज्यांचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतात. अशा घटनांपैकी एक अत्यंत महत्त्वाची आणि गौरवशाली घटना म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होय. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर संपन्न झालेला हा सोहळा केवळ एका राजाच्या सिंहासनारोहणाचा कार्यक्रम नव्हता, तर तो हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौमतेची जगासमोर झालेली अधिकृत घोषणा होती. या ऐतिहासिक प्रसंगाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला नवे वळण दिले. अनेक शतकांपासून परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली असलेल्या जनतेच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा हा क्षण होता. म्हणूनच ६ जून हा दिवस महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा, प्रेरणेचा आणि राष्ट्रभक्तीचा दिवस मानला जातो.



सतराव्या शतकातील भारताचा इतिहास पाहिला तर देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. दिल्लीतील मुघल सत्ता विस्ताराच्या शिखरावर होती. दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांसारख्या विविध सत्तांचे वर्चस्व होते. सामान्य जनता करांचा बोजा, अन्याय, अत्याचार आणि असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत होती. समाजामध्ये निराशा आणि परावलंबित्वाची भावना वाढीस लागली होती. अशा वेळी महाराष्ट्राच्या मातीत एक असे व्यक्तिमत्त्व उदयास आले ज्याने स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात साकार करून दाखविले. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना माता जिजाऊंनी रामायण, महाभारत आणि भारतीय संस्कृतीतील आदर्शांचे संस्कार दिले. अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि दुर्बलांचे रक्षण करण्याची प्रेरणा बालपणापासूनच त्यांच्या मनात रुजली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत लहान वयात स्वराज्य उभारणीचा संकल्प केला. त्या काळात स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. परंतु दृढनिश्चय, धाडस आणि जनतेवरील विश्वास यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याचा पाया रचला. तोरणा किल्ला जिंकून त्यांनी स्वराज्याच्या स्थापनेची पहिली पायरी गाठली. त्यानंतर राजगड, पुरंदर, कोंढाणा, प्रतापगड, जावळी यांसारख्या अनेक प्रदेशांवर स्वराज्याचा झेंडा फडकला. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील धाडसी हल्ला, सुरतेवरील मोहीम आणि आग्र्याहून केलेली थरारक सुटका या घटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती संपूर्ण भारतभर पसरली. त्यांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर लोकांच्या मनात स्वराज्याची भावना निर्माण केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य प्रत्यक्षात स्वतंत्र होते. तथापि, त्या काळातील राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेनुसार राज्यकर्त्याला सार्वभौम शासक म्हणून अधिकृत मान्यता मिळण्यासाठी राज्याभिषेक आवश्यक मानला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधकांकडून त्यांच्या क्षत्रियत्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. तसेच स्वराज्याला स्वतंत्र राजकीय अस्तित्व प्राप्त झाले असले तरी त्याला अधिकृत स्वरूप देणे गरजेचे होते. त्यामुळे राज्याभिषेकाचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता, तर तो राजकीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा होता. राज्याभिषेकामुळे स्वराज्य हे कोणत्याही सुलतानाच्या किंवा बादशहाच्या अधिपत्याखाली नसून स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य असल्याचे जगाला जाहीर होणार होते.

राज्याभिषेकाच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले. रायगड किल्ला सजविण्यात आला. संपूर्ण स्वराज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. देशभरातील विद्वान, संत, पंडित, सरदार आणि मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले. काशीचे प्रसिद्ध वेदपंडित गागाभट्ट यांना राज्याभिषेक विधीचे प्रमुख म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशावळीचा अभ्यास करून त्यांना क्षत्रिय असल्याचे प्रमाणित केले. त्यामुळे राज्याभिषेकास धार्मिक आणि सामाजिक मान्यता प्राप्त झाली.

६ जून १६७४ रोजी पहाटे राज्याभिषेकाचा मुख्य सोहळा पार पडला. त्यानंतर सुवर्णसिंहासनावर त्यांना विराजमान करण्यात आले. त्या क्षणी रायगडाच्या भूमीवर इतिहास घडत होता. अनेक शतकांनंतर भारतीय भूमीवर एका स्वतंत्र हिंदवी राज्याच्या सार्वभौम राजाचा राज्याभिषेक होत होता. हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वांत अभिमानास्पद क्षणांपैकी एक मानला जातो.

राज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय मान्यता मिळाली. त्यांच्या सत्तेला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले. स्वराज्याचा स्वतंत्र शासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. याच वेळी स्वतंत्र राजमुद्रा स्वीकारण्यात आली. राजमुद्रेवरील श्लोक स्वराज्याच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक होता. प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढणारे आणि लोककल्याणासाठी कार्य करणारे राज्य ही त्यामागील संकल्पना होती.

राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक मजबूत केले. अष्टप्रधान मंडळाची रचना अधिक प्रभावीपणे कार्यरत झाली. पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश आणि पंडितराव या आठ प्रमुख पदांमार्फत राज्यकारभार चालविला जात होता. प्रत्येक विभागाची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. शासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे स्वराज्याची प्रशासनव्यवस्था त्या काळातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी ठरली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार लोककल्याणकारी होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. जमिनीचे मोजमाप करून न्याय्य महसूल पद्धती लागू केली. शेतकऱ्यांवर अतिरिक्त करांचा भार टाकला गेला नाही. दुष्काळ किंवा संकटाच्या काळात त्यांना मदत पुरविण्यात आली. त्यामुळे स्वराज्यातील कृषीव्यवस्था मजबूत झाली. जनतेच्या कल्याणासाठी शासन असावे, ही त्यांची भूमिका होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना रयतेचा राजा असे संबोधले जाते.

स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. युद्धात शत्रूपक्षातील स्त्रियांनाही सन्मानाने वागणूक दिली जात असे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जात होती. त्या काळात स्त्रियांच्या सुरक्षेला विशेष महत्त्व देणारा असा दृष्टिकोन अत्यंत दुर्मीळ होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आधुनिक आणि प्रगत मानला जातो. धार्मिक सहिष्णुता हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्ये होते. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात विविध धर्मांचे लोक कार्यरत होते. मशिदी, दर्गे आणि मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात आले. त्यांचा संघर्ष कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता, तर अन्यायकारक आणि अत्याचारी सत्तेविरुद्ध होता. त्यामुळे स्वराज्य हे सर्वधर्मसमभाव आणि न्याय यांवर आधारित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी संरक्षणव्यवस्थेतही अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांनी किल्ल्यांचे सशक्त जाळे उभारले. प्रत्येक किल्ल्याचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचा विकास केला. गनिमी कावा ही युद्धपद्धती प्रभावीपणे वापरून त्यांनी बलाढ्य शत्रूंना पराभूत केले. त्यांचे सैन्य शिस्तबद्ध, प्रशिक्षित आणि निष्ठावान होते. याशिवाय त्यांनी सागरी सुरक्षेलाही विशेष महत्त्व दिले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे जलदुर्ग बांधून त्यांनी आरमाराची उभारणी केली. भारतीय इतिहासात सशक्त नौदल निर्माण करणाऱ्या शासकांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

राज्याभिषेकामुळे स्वराज्याला नवीन ऊर्जा प्राप्त झाली. मराठा साम्राज्याच्या विस्ताराला गती मिळाली. पुढील काळात मराठा सत्ता महाराष्ट्राबाहेरही विस्तारली. स्वराज्याची संकल्पना संपूर्ण भारतात पोहोचली. अनेकांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा केवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्हे, तर भारतीय राष्ट्रचेतनेच्या इतिहासातीलही एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सांस्कृतिक प्रभावही मोठा होता. मराठी भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीला नवसंजीवनी मिळाली. प्रशासनात मराठी भाषेचा वापर वाढला. स्थानिक परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन मिळाले. स्वराज्याच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ प्राप्त झाले. आजही महाराष्ट्रातील लोकजीवनात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत आदराचे आहे. आधुनिक काळात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. आज भारत एक लोकशाही राष्ट्र आहे. लोकशाहीतील अनेक मूल्ये जसे की सुशासन, लोककल्याण, न्याय, समानता आणि उत्तरदायित्व यांची झलक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात दिसून येते. त्यांनी दाखविलेला आदर्श आजच्या प्रशासकांसाठी, राजकारण्यांसाठी आणि समाजनेत्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, स्त्रियांचा सन्मान, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या मूल्यांची आजही समाजाला गरज आहे.

दरवर्षी ६ जून रोजी महाराष्ट्रासह देशभरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा केला जातो. रायगडावर विशेष सोहळ्यांचे आयोजन केले जाते. हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि पर्यटक रायगडावर जाऊन महाराजांना अभिवादन करतात. विविध ठिकाणी व्याख्याने, प्रदर्शन, पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक मिरवणुका आयोजित केल्या जातात. या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचविण्याचे कार्य केले जाते. आजच्या युवकांसाठी शिवराज्याभिषेक दिन विशेष प्रेरणादायी आहे. नेतृत्व, संघटनकौशल्य, धैर्य, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा या गुणांचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून शिकता येते. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही हार मानली नाही. संकटांना संधीमध्ये बदलून त्यांनी स्वराज्याची उभारणी केली. हीच प्रेरणा आजच्या तरुणांना जीवनातील आव्हानांचा सामना करण्यासाठी उपयोगी ठरू शकते.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि लोककल्याण यांचा विजय होता. रायगडावरील त्या सुवर्णक्षणाने महाराष्ट्राला सार्वभौम नेतृत्व दिले, जनतेला आत्मविश्वास दिला आणि भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली. ६ जून हा दिवस आपल्याला केवळ भूतकाळातील वैभवाची आठवण करून देत नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांची जाणीवही करून देतो.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आपण छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला, त्यांच्या अद्वितीय नेतृत्वाला आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेला अभिवादन करतो. स्वाभिमान, न्याय, लोककल्याण, राष्ट्रप्रेम आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचे जतन करूनच आपण त्यांच्या कार्याचा खरा वारसा पुढे नेऊ शकतो. रायगडावर झालेला राज्याभिषेक हा इतिहासातील एक प्रसंग असला, तरी त्यातून मिळणारी प्रेरणा चिरंतन आहे. जोपर्यंत स्वराज्य, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांवर मानवाचा विश्वास राहील, तोपर्यंत छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि त्यांचा तेजस्वी वारसा भारतीय जनमानसात अजरामर राहील.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०८२३५

# झाडं लावण्यासाठी सरकारनंच पुढाकार घ्यावा!

आज उष्णतामान फारच वाढलं आहे. सकाळी उठलं की या उष्णतेनं झोप न लागत असल्यानं सतत मळमळ व उलटीसारखं वाटायला लागतं. त्यातच रात्रभर कुलर जरी आपण लावून झोपलो, तरी पुरेशी झोप होत नाही. त्याला कारण आहे आजची परिस्थिती. आज परीसरात झाडं नसल्यानं ही स्थिती आहे व ही स्थिती आजच एवढी भयावह आहे आणि संकेत देत आहे की जर अशीच परिस्थिती नेहमीसाठी सुरु राहिली की उद्या तो दिवस दूर नाही की हीच परिस्थिती सर्वांना जाळत सुटेल.

आज उष्णतामान वाढलं आहे. याला कारणीभूत आहे मोठमोठ्या सडका बनवणे व त्यासाठी उभी असलेली झाडंची झाडं तोडणं. अशी झाडं तोडली गेली व सिमेंटचे रस्ते बांधकाम केले गेले. मात्र काल रस्त्याच्या दोन्ही कडेला असणारी झाडं तोडली परंतु आज सिमेंट रस्त्याचं बांधकाम पुर्ण झालं तरी काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला आजही झाडं लावली गेली नाहीत. याला जबाबदार कोण? याला साहजीकच प्रशासन जबाबदार आहे. व्यतिरीक्त सर्व लोकं म्हणतात व झाडं नसल्याचा दुष्परिणाम सांगतात. परंतु स्वतः झाडं लावत नाहीत व झाडं लावण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. ते फक्त बोलतात. कृती मात्र शुन्य असते.

काल अंगणात झाडं होती. कुलर वा एसी बहुतांश नव्हताच. तो अतिशय श्रीमंत माणसांकडे असेलही कदाचीत. परंतु गरीबांकडे तो अजीबात नव्हताच. त्यावेळेस घरातील सर्व मंडळी अंगणात असलेल्या झाडाखाली पलंग टाकत असत व रात्रीची निवांत झोपही घेत असत. आज मात्र तसं नाही. आज लोकांचं उन्हाळ्यातील आयुष्य कुलर आणि एसीमध्येच जात असतं. लोकांना आज अजीबात उष्णतामानाचे चटके सहन करायला वेळ नाही. समजा कुलर नसेल तर पंख्याच्या हवेची तरी मजा घेतात आजचे लोक. परंतु झाडाखाली झोपत नाहीत. कारण झाडंच नाहीत.

काल झाडाबाबत बरेच समज गैरसमज होते. जसं चिंचेच्या झाडाखाली झोपू नये. लावडीन येते. चिंचेच्या झाडाखाली झोपू नये. चिंचेचं झाड कार्बन डायऑक्साईड वायू सोडतो. जो वायू श्वसनाला मदत करीत नाही तर माणसाला मारतो. परंतु आज ते चिंचेचं झाडंही दिसत नाही. अशी चिंचेची झाडं गावांमध्ये चौकाचौकात दिसायची. आज ती तोडली असल्यानं अजीबात दिसत नाहीत. मग झाडंच नाहीत तर ऑक्सिजन येणार कुठून? मग माणसाला गुदमरल्यासारखं नाही लागणार तर कसं लागेल. महत्वपुर्ण बाब ही की आज तापमान वाढलं आहे असे सारेच जण म्हणतात. परंतु त्या वाढत्या तापमानावर कोणीच उपाययोजना करायला तयार नाहीत. झाडं लावावीत ही ओरड आजची नाही. त्याला कमीतकमी वीस पंचवीस वर्षाचा काळ झाला. परंतु कोणीच झाडं लावली नाहीत वा लावण्याचा प्रयत्न दाखवला नाही. हं, रस्ते रुंदीकरणासाठी झाडं मात्र तोडण्याचा नक्कीच प्रयत्न केला. सर्वत्र उदासीनता. याबाबत खरं सांगायचं झाल्यास आजच्या काळात आळसच भरला आहे लोकांत, असंच जाणवतं. काल घराघरामधील खिडक्या व दरवाजेही उघडे राहायचे. आज त्याला उघडं ठेवायला जागा नाही. फ्लॅटच्या जिंदगीत तर दरवाजे बंदच असतात. बेल वाजवूनही उघडली जात नाहीत दारं. मग कुठून मिळणार मोकळी हवा? म्हणूनच श्वास गुदमरतो आहे. अलिकडे तर खिडक्याही बंद असतात.

झाडं लावण्याचा जो उपक्रम आहे. तो सर्वांनीच राबवावा. सर्वांनीच जिथं जागा मिळेल, तिथं झाडं लावण्याचा प्रयत्न करावा. झाडं असतील तर आपण सुखी होवू, हा एकच मुलमंत्र डोक्यात ठेवावा. बाकी सर्व विसरुन जावं. झाडं लावणं याला एक उपक्रमच समजावे व तो उपक्रम आपण जसे राबवणार. तसाच तो उपक्रम सरकारनंही राबवावा. याला प्रश्नाचे स्वरुप देवू नये. कारण जसे, इतर कोणी झाडं लावा म्हटलं तरी झाडं कोणीच लावत नाहीत. त्यासाठी झाडं लोकांनी लावली पाहिजेत म्हणून सरकारनं योजना देतांना ज्यानं झाड लावलं त्यालाच योजनांचा लाभ द्यावा. इतरांना नको. शिवाय जे झाड लावलं. त्या झाडावर आपल्या नावाची पाटी असावी असं बंधन घालावं. सेल्फी काढता आला तर काढायला लावावा. तो व्हायरल करायला लावावा. जो इतरांना प्रेरणा देईल. झाडं जगली पाहिजे म्हणून शासनाने सर्वांनाच कठडे पुरवावे. शिवाय झाडं ही प्रत्येक घरी एक याप्रमाणे रचना असावी. ज्यात नगरपालिका, ग्रामपंचायत, महानगरपालिका, स्थानीय वसाहत, काही समाजसेवक, पोलीस प्रशासन या सर्वांनी पुढाकार घ्यावा. जेणेकरुन झाडं अति प्रमाणात लावली जातील व तापमान वाढीला मदत होईल.

महत्वाचं सांगायचं झाल्यास तापमान वाढ हा भष्मासूरच आहे. याचे परीणामही दूरगामी होत आहेत. ते आपणाला पाहायला मिळत आहेत. तसाच जेव्हा जेव्हा उन्हाळा येतो आणि तापमान वाढ दिसते. तेव्हा तेव्हा आपणाला तापमान वाढीवर उपाय म्हणून झाडं लावण्याचा विचार करतो माकडाच्या कथेसारखा आणि उन्हाळा संपलाच तर आपली आठवण विसरुन जाते. मग वर्षभर उन्हाळा येईपर्यंत आपल्याला झाडं लावण्याची आठवणही येत नाही. जसं एक माकड पावसाळा लागताच ओला होतो व त्याला वाटते की आपण पावसापासून संरक्षण करण्यासाठी एक घर बांधायला हवं. परंतु जसा पावसाळा संपतो. तशी त्याची आठवण संपते. ती पुढील पावसाळा येईपर्यंत. आपलीही झाडं लावल्याबद्दल हीच गत आहे. उन्हाळा आला की झाडं लावण्याची आठवण येते आणि उन्हाळा गेला की ती आठवण संपून जाते. कारण आपणही माकडाचेच वंशज आहोत. म्हणूनच हे चालणारच. परंतु हे जरी खरं असलं तरी आज गरज आहे झाडं लावण्याची. माकडाचं ठीक आहे की त्याचं भागून जातं व तो एक प्राणी असल्यानं त्याला ते कळत नाही. परंतु आपण माणूस आहोत व आपल्याला जाणीव आहे. आपण झाडं लावू शकतो. तसंच ती झाडं लावून आपण आपलंच नाही तर कित्येक प्राण्यांचंही संरक्षण करु शकतो हे तेवढंच खरं आहे. म्हणूनच कोणी सांगायची वाट पाहण्याऐवजी आपण स्वतःच पुढाकार घेवून झाडं लावलेली बरी हे तेवढंच खरं आहे. कारण झाडंच आपल्याला मारणार आहेत आणि तीच आपल्याला तारणारही आहेत.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# समाजाचा बुलंद आवाज : माधवराव गायकवाड!



नेतृत्व असं असावं जे केवळ पदाने नाही तर आपल्या कर्तृत्वाने आणि कार्यकर्तृत्वाने लोकांच्या मनावर राज्य करेल! हे वाक्य ज्यांच्या व्यक्तिमत्वाला तंतोतंत लागू होतं ते नेतृत्त्व म्हणजे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रामाणिक, निष्ठावंत आणि लोकाभिमुख प्रदेशाध्यक्ष, 'चर्मकारांचा वाघ' माधवराव गायकवाड यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांच्या या वादळी आणि सेवाभावी प्रवासाचा घेतलेला हा धावता आढावा...

माधवराव गायकवाड यांनी प्रदेशाध्यक्षपदाची धुरा हाती घेतल्यापासून अक्षरशः सबंध महाराष्ट्र पिंजून काढला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, प्रत्येक शहर आणि घराघरांपर्यंत पोहोचून त्यांनी चर्मकार समाजाला संघटित करण्याचं अभूतपूर्व काम केलं आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून, त्यांच्या सुख-दुःखात थेट सामील होणारा असा जमिनीवरचा नेता आजच्या काळात विरळाच!

आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील समाजबांधव त्यांना केवळ ओळखत नाही, तर त्यांच्यावर जीवापाड प्रेम करतो. नांदेड ही स्वामी रामानंद तीर्थ आणि अनेक संतांची भूमी. याच मातीचा वारसा लाभलेले माधवराव गायकवाड आज संपूर्ण महाराष्ट्रात नांदेडचं नाव उज्ज्वल करत आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वात नांदेडची 'संत शिरोमणी रविदास महाराज जयंती' ही संपूर्ण महाराष्ट्रात 'एक नंबर' आणि सर्वात शिस्तबद्ध, भव्य दिव्य अशी साजरी केली जाते. हा केवळ एक उत्सव नसून, समाजाच्या अस्मितेचा आणि एकतेचा तो सर्वात मोठा सोहळा बनला आहे.

माधवरावांचा दृष्टिकोन हा नेहमीच पुरोगामी आणि शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा राहिला आहे. त्यांच्या माध्यमातून घेतला जाणारा 'गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा' हा संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श ठरला आहे. या कार्यक्रमाची भव्यता आणि गांभीर्य एवढं मोठं असतं की, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदार आणि खासदार या सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहतात. तरुण पिढीने शिकावे आणि मोठे व्हावे, हीच त्यांची खरी तळमळ आहे.

समाजाविषयी प्रचंड आस्था, कणव आणि प्रेम असणारा हा अवलिया कार्यकर्ता समाजाच्या हितासाठी, गोरगरिबांच्या मदतीसाठी स्वतःच्या खिशातून लाखो रुपये खर्च करताना कधीही मागेपुढे पाहत नाही. पद, प्रतिष्ठा यापेक्षा समाजाचे हित त्यांच्यासाठी नेहमीच वरचढ राहिले आहे. सर्वांना बरोबर घेऊन चालण्याची त्यांची अजातशत्रू वृत्ती आणि संघटन कौशल्य यामुळेच ते आज खऱ्या अर्थाने 'चर्मकारांचा वाघ' म्हणून ओळखले जातात. अशा या धडाडीच्या, प्रामाणिक आणि बहुआयामी नेतृत्वाला, राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या या बुलंद आवाजाला वाढदिवसाच्या अनंत मनःपूर्वक शुभेच्छा! ईश्वर त्यांना उदंड आयुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो, हीच संत गुरु रविदास महाराज यांच्या चरणी प्रार्थना!

**-शिवाजी साळवे**
प्रदेश कार्याध्यक्ष,
राष्ट्रीय चर्मकार महासंघ.

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजना गरोदर महिलांना मिळणार ११ हजार रुपयांपर्यंतचा लाभ

**मुंबई (वृत्तसंस्था)** -केंद्र सरकारकडून गरोदर महिला आणि स्तनदा मातांच्या आरोग्यासाठी आणि पोषणासाठी 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' राबवली जात आहे. 'मिशन शक्ती' अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे आता पात्र महिलांना त्यांच्या पहिल्या आणि दुसऱ्या अपत्यासाठी ११,००० रुपयांपर्यंतचा आर्थिक लाभ दिला जात आहे.

२०१७ मध्ये पुन्हा विस्तारित स्वरूपात सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश गरोदरपणाच्या काळात मातांना आर्थिक बळ देणे, बालमृत्यू दर कमी करणे आणि माता-बालकांचे आरोग्य सुधारणे हा आहे. ही योजना थेट लाभ हस्तांतरणद्वारे राबविली जाते, ज्यामुळे मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते.

पहिल्या अपत्यासाठी: ५,००० रुपयांची मदत दोन टप्प्यांत दिली जाते. पहिल्या हप्त्यात ३,००० रुपये (गरोदरपणाची नोंदणी केल्यानंतर) आणि दुसऱ्या हप्त्यात २,००० रुपये (बाळाच्या जन्मानंतर) दिले जातात.

दुसऱ्या अपत्यासाठी: जर दुसरे अपत्य 'मुलगी' असेल, तर सरकारकडून ६,००० रुपयांची अतिरिक्त आर्थिक मदत एकरकमी दिली जाते.

# जागतिक पर्यावरणदिनी हरित नांदेड अभियानास सुरुवात

## वृक्षलागवडीसाठी महानगरपालिका, सामाजिक संस्था व वृक्षमित्र फाउंडेशनचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि. ५ जून रोजी महापालिकेच्या विसावा उद्यान येथील आयोजित कार्यक्रमात हरित नांदेड अभियानास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विविध सामाजिक संस्था व वृक्षमित्र फाउंडेशनचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नांदेड महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने मागील आठ वर्षांपासून लोकसहभागातून वृक्ष लागवड संगोपनाचे कार्य सुरू आहे. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून हरित नांदेड उपक्रमांतर्गत २०२६ च्या मान्सूनमध्ये महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा हद्दीत एकूण १८००० वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. या अभियानाची सुरुवात पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दिनांक ५ जून रोजी विसावा उद्यान येथे वृक्षारोपण करून करण्यात आली आहे.

नांदेड शहराचे वाढलेले तापमान नियंत्रित करण्यासाठी सर्व सामाजिक संस्था एकवटल्या असून, नियोजनबद्ध कार्यक्रमातून वृक्षांची लागवड करुन त्यांचे संवर्धन करण्यासाठी महापालिका प्रशासन, वृक्षमित्र फाउंडेशन, गुरुव्दारा लंगर साहेब व शहरातील विविध सामाजिक संस्था एकवटल्या आहेत. या सर्वांच्या पुढाकाराने व सहकार्याने हरित नांदेड हे अभियान यशस्वी करण्यात येणार आहे. या अभियानाची सुरुवात विसावा उद्यान येथे प्रतिनिधीक स्वरुपात वृक्षारोपण करुन करण्यात आली आहे. येणाऱ्या काळात शहरातील विविध भागांत वृक्षारोपण करुन लागवड करण्यात आलेले वृक्ष जोपासण्याच्या दृष्टीकोणातून सामाजिक संघटनेमार्फत ट्री गार्ड, ठिबक सिंचन, तार फेंसिंग इत्यादी आवश्यक बाबींची पुर्तता केली जाणार आहे.

ग्लोबल वॉर्मिंगच्या काळात शहराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी आणि भावी पिढीला शुद्ध हवा मिळण्यासाठी वृक्षारोपण काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरात किंवा परिसरात किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे आणि नांदेडला सुंदर, स्वच्छ व हरित बनवण्यास सहकार्य करावे.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकवार, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, रावण सोनसळे, राजेश जाधव, गौतम कवडे, निलावती डावरे, वृक्षमित्र फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष मुगटकर, सतीश कुलकर्णी, शैलेंद्र क्षीरसागर, नरेश यन्नावार, रवी रणखांब, कैलास अमिलकंठवार, प्रितम भराडिया यांच्यासह मोठ्या प्रमाणात पर्यावरणप्रेमी नागरीक, संस्था प्रतिनिधी, मनपा कर्मचारी व वृक्षमित्र यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी हरित नांदेड अभियाना संदर्भात महानगर-पालिकेच्या नियोजनाची भूमिका व प्रास्ताविक उद्यान अधीक्षक डॉ. फरहतुल्ला बेग यांनी केले. उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाची शपथ ब्रम्हकुमारी स्वाती बहेनजी यांनी दिली तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृक्षमित्र फाउंडेशनचे संतोष मुगटकर यांनी केले.

या अभियानामध्ये सामाजिक संस्था वृक्षमित्र फाउंडेशन, रोटरी क्लब, गोदावरी नदी संसद, ऑल इंडिया रिन्युवेबल एनर्जी असो., नांदेड जनरल ट्रेडर्स असोसिएशन, मेथेडिस्ट मेन्स-मेथेडिस्ट चर्च, श्री दत्तकृपा बहु. सेवाभावी संस्था वाघाळा, मातृभूमी सेवा संघ, अगरवाल महिला मंडळ, संत ज्ञानेश्वर सेवाभावी संस्था, ब्रम्हकुमारीज वसंतनगर, मातृभूमी सेवा संघ नांदेड, ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल, वैश्य शिक्षक व कर्मचारी महासंघ नांदेड, फिंगर प्रिंट प्रि स्कूल, चक्रवर्ती सम्राट अशोक प्रतिष्ठान, नंदगिरी किल्ल्याचे किल्लेदार नांदेड, मातोश्री जनाई बहुउद्देशी सेवाभावी, आर. के. बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, मातोश्री जनाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था येळेगाव इत्यादी संस्था सक्रिय सहभागी असणार आहेत.

### नांदेड परिक्षेत्रातील गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम

# चौथ्या दिवशी परिक्षेत्रात आणखी ६ कारवाया, ७ आरोपी गजाआड

**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिनांक १ ते ३० जून, २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे. याप्रमाणे परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे.




या मोहिमेच्या चौथ्या दिवशी गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ६ गुन्हे नोंदवत या व्यवसायात गुंतलेल्या एकूण ७ आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे.

या मोहिमेअंतर्गत, परिक्षेत्रातील नांदेड जिल्ह्यात ३, परभणी जिल्ह्यात २ तर लातूर जिल्ह्यात १ अशा एकूण ६ कारवाया करण्यात आल्या आहेत. एकूण ७ आरोपींकडून १ लाख ४९ हजार ६६४ रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

उपरोक्त पदार्थांच्या संदर्भात संबंधिताविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये कारवाई करण्यात आली असून, सदर कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा आहे. त्यास दहा वर्षेपर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम : गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची पानटपऱ्यांवरून होणारी विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. काल दिवसभरात नांदेड परिक्षेत्रात एकूण ४६६ पान टपऱ्यांची तपासणी करण्यात आल्या असून, अंमली पदार्थांच्या साठवणुकीची संभाव्य ठिकाणे देखील तपासण्यात येत आहेत.

**'खबर' हेल्पलाइनवरून माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उप- महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी यांनी केले आहे.

# नांदेड येथे 'शब्द शब्द तुझाच आहे' या कवितासंग्रहाचा ७ जूनला प्रकाशन सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील वस्तू व सेवा कर विभागाचे राज्यकर उपायुक्त निलेश शेवाळकर लिखित 'शब्द शब्द तुझाच आहे' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता स्व. पूर्णामलजी लाहोटी सभागृह, सायन्स कॉलेज, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मराठी कवी, साहित्यिक व व्याख्याते इंद्रजीत भालेराव हे राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील रहिवाशी सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक, छत्रपती संभाजीनगर येथील वस्तू व कर विभागाचे अपर राज्यकर आयुक्त अभिजित राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तसेच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची उपस्थिती राहणार आहे.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख रामकृष्ण सोलंके, तसेच ग्रंथाली प्रकाशनचे विश्वस्त सुदेश हिंगलापूरकर उपस्थित राहणार आहेत.

ग्रंथाली प्रकाशन, मुंबई निर्मित या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास सर्व साहित्यप्रेमी व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथाली प्रकाशन व निलेश वसंतराव शेवाळकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तरुण तिवाडी याचे सीए परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)**– आयसीएआय, दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल (सीए) परीक्षा मे-२०२५ मध्ये प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचा तरुण मुरारीलाल तिवारी या विद्या-र्थ्याने यश संपादन केले.



या परीक्षेसाठी तरुण तिवाडी यांनी फाउंडेशननंतर ऑनलाइन क्लासेसच्या मदतीने अतिशय परिश्रमपूर्वक आणि जिद्दीने हे यश मिळविले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. गजानन वाघमारे, ग्रंथपाल, डॉ. रवींद्र लाठकर, डॉ. दीपक वाघमारे, प्रा. डॉ. संजय हापगुंडे, डॉ. श्रीमंत राऊत, कार्यालयीन अधीक्षक राजेश अय्यंगार यांनी अभिनंदन केले.

# ज्येष्ठांच्या हक्कासाठी नांदेडमध्ये १० जूनला 'लक्षवेधी आक्रोश धरणे आंदोलन'

## ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या कारणास्तव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरण्याचा निर्णय -डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनवाढीसह विविध प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी फेस्कॉमच्या उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागातर्फे १० जून रोजी मुंबईतील आझाद मैदानावर जाहीर करण्यात आलेले 'लक्षवेधी आक्रोश आंदोलन' मुंबई ऐवजी आता नांदेड येथे होणार असल्याची माहिती डॉ. हंसराज वैद्य यांनी दिली आहे. काही अपरिहार्य कारणामुळे व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या संदर्भात राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सामाजिक न्याय विभाग तसेच संबंधित वरिष्ठ मंत्री तथा अधिकाऱ्यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यापूर्वी २९ मे रोजी पत्रकार परिषदेद्वारे आणि ३ जून रोजी मुंबईतील आंदोलनाची घोषणा करण्यात आली होती. मात्र आंदोलनात सहभागी



होणाऱ्या बहुतांश नागरिकांचे वय ७० ते ९० वर्षांच्या दरम्यान असून त्यांपैकी अनेकजण मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, अर्धांगवायू आदी गंभीर व गुंतागुंतीच्या आजारांनी ग्रस्त आहेत. आंदोलनात भाग घेण्याची त्यांची तीव्र इच्छा आहे. त्यामुळे सुमारे ६००-७०० किलोमीटरचा प्रवास त्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो, असे डॉ. हंसराज वैद्य यांनी नमूद केले.

राज्यात काही ज्येष्ठ नागरिकांना मिळणारे केवळ ३०० रुपयांचे मासिक मानधन अत्यंत अपुरे तथा तुटपुंजे असल्याची टीकाही त्यांनी केली. आंध्र प्रदेश, हरियाणा आणि तेलंगणा यांसारख्या राज्यांमध्ये ज्येष्ठांना अधिक सन्मानजनक आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचे सांगत महाराष्ट्रानेही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

फेस्कॉमने शासनासमोर १२ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये जागतिक मान्यतेप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांचे वय वर्षे साठच ग्राह्य धरणे, शासनाच्या सर्व योजना साठ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना लागू करणे, 'लाडके माय-बाप योजना' सुरू करणे, विस्थापित, गरीब, गरजवंत, दुर्लक्षित, उपेक्षित, वंचित विधवा माता तथा दिव्यांग पात्र ज्येष्ठ नागरिकांना दरमहा शेजारील आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगाना आदी राज्यांप्रमाणे महाराष्ट्र राज्यातही किमान पाच हजार रुपये मानधन द्यावे, स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक कल्याण मंत्रालय व राज्य ज्येष्ठ नागरिक आयोग स्थापन करणे, ज्येष्ठ नागरिकांमधून एक महिला व पुरुष विधान परिषद व राज्यसभेवर घेण्याचा कायदा करणे, ज्येष्ठ नागरिकांना राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषित करणे, प्रत्येक जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिक भवन उभारणे, मोफत आरोग्य व प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे, मालमत्ता संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, ज्येष्ठ नागरिकांचे पारित कायदे नियम तंतोतंत अमलात आणणे, ज्येष्ठ नागरिकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन सन्मानाची वागणूक देणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

# रवी पंडित तुप्पेकर यांना छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिला जाणारा छत्रपती शाहू महाराज समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्कार रवी पंडित तुप्पेकर यांना जाहीर झाला आहे.



मागील अनेक वर्षापासून सातत्याने व सक्रियपणे सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रामध्ये भरीव योगदान दिल्याबद्दल त्यांच्या कार्याची नोंद घेऊन पीपल्स फोर्सने हा पुरस्कार जाहीर केला आहे.

रवी पंडित तुप्पेकर यांना जाहीर झालेल्या या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल अनेकांनी अभिनंदन करून त्यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. हा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे समाजासाठी काम करण्याची प्रेरणा आणि ऊर्जा मिळाली आहे, असे रवी पंडित तुप्पेकर यांनी सांगितले.

# मेंडका येथे खतांच्या संतुलित वापराबाबत शेतकरी प्रशिक्षण व जनजागृती मोहीम संपन्न

**मुदखेड (प्रतिनिधी)** –कृषी विभाग आणि 'आत्मा' (TM) यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक २ जून २०२६ रोजी मौजे मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) येथे 'जिल्हांतर्गत शेतकरी प्रशिक्षण' आणि 'धरती माता बचाव अभियान' अंतर्गत खतांच्या संतुलित वापराबाबत जनजागृती मोहीम व प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून मुदखेडच्या तालुका कृषी अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे मॅडम ह्या उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी रासायनिक खतांचा अनिर्बंध व अयोग्य वापर टाळण्याचे आवाहन केले.

तसेच लवकर येणारे वाण सोयाबीन पिकासाठी जसे js-9305, maus,-612,maus- 725 Maus-71 तसेच तूर पिकासाठी BDN -७११,




१५० ते १५५ दिवसात येणारी पांढऱ्या दाण्याची तसेच BDN -७१६ लाल दाण्याची १६० ते १७० दिवसात येणारी वान तसेच पुरेसा पाऊस झाल्याशिवाय म्हणजेच ८० ते १०० मी. मी. पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. उगवणक्षमता तपासून आणि बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी..आणि युरिया डीएपीला पर्यायी खत वापरावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्राच्या विविध विषय तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. देवीकांत देशमुख यांनी यंदाच्या 'एल निनो' च्या पार्श्वभूमीवर हवामानाचा अंदाज घेऊनच शेतकऱ्यांनी योग्य वेळी पेरणी करावी, असे आवाहन केले.

माणिक कल्याणकर यांनी पिकांवरील कीड व रोगव्यवस्था-पणाविषयी सविस्तर माहिती देऊन वेळीच उपाययोजना करण्याचे महत्त्व पटवून दिले. संदीप जायभाये यांनी कमी कालावधीत येणाऱ्या सोयाबीन, तूर, मूग आणि उडीद पिकांच्या सुधारित जातींची माहिती दिली. तसेच, टोकण यंत्र, बेड पद्धत आणि 'बीबीएफ' पेरणी यंत्राच्या साहाय्याने पेरणी करण्याचे आवाहन केले. महेश अंभोरे यांनी पशुधनाचे (जनावरांचे) खाद्य व्यवस्थापन, त्यापासून शेतीला होणारे लाभ आणि शासनाच्या पशुसंवर्धनविषयक विविध योजनांची माहिती दिली.

या कार्यक्रमास उप कृषी अधिकारी देवराव ढोले आणि सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती रेशमलवर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'आत्मा'चे तालुका तंत्र व्यवस्थाप व्ही. बी. गीते यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मंडळ कृषी अधिकारी राम कपाटे यांनी मानले. या प्रशिक्षण व जनजागृती मोहिमेला मेंडका व परिसरातील शेतकरी बांधव अतिशय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड येथे अस्मिता लिग सायकलिंग स्पर्धेचे आयोजन

## १४, १७, १९ वयोगटांत मुलींना सहभागी होण्याची संधी

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील जुना कौठ्याच्या मोदी मैदानावर रविवार, दि. १४ जून रोजी अस्मिता लीग सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती नांदेड जिल्हा सायकल असोसिएशनचे अध्यक्ष निखिल लातूरकर यांनी दिली.

केंद्र शासन, साई व सीएफआय आणि जिल्हा क्रिडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने हा उपक्रम महिला सबलीकरण व खेळात मुलींच्या सहभाग वाढावा या हेतूने अस्मिता लिग सायकलिंग स्पर्धेचे आयोजन संपूर्ण भारतभर करण्यात येत आहे. यातून नांदेड येथे रविवार, दिनांक १४ जून रोजी या मोहीम अंतर्गत जिल्हा ते राष्ट्रीय सायकलींग स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेतून गुणवत्ता पूर्ण मुलींचा शोध घेऊन त्यांना भविष्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू बनवण्यासाठी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतून प्राविण्य प्राप्त खेळाडूंना येत्या राष्ट्रीय पातळीवर सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर जिल्हा स्पर्धेतून विशेष गुणवत्ता खेळाडूंना प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान पटकावणाऱ्यांना मेडल व प्राविण्य प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा कार्यालय नांदेड व नेहरु युवा केंद्र जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशन व नांदेड जिल्हा सायकल असोसिएशनचे अध्यक्ष निखिल लातूरकर, सचिव बंटी सोनसळे, सहसचिव निलेश खराटे, वैभव दोमकोंडवार. गोविंद पांचाळ, कांचन मस्के, चंद्रकात आढाव, म. अन्वर, बालाजी गाडेकर, विजय राठोड, उध्दव चौधरी, सुभाष लोखंडे यांनी दिली.

# राष्ट्र सेवा दलाच्या विज्ञान, साहस व छंद शिबिराचे किनवट येथे उत्साहात उद्घाटन

**किनवट (प्रतिनिधी)**– भारत जोडो युवा अकादमी व राष्ट्र सेवा दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान, साहस व छंद शिबिराचे उद्घाटन साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, एमआयडीसी कोठारी, किनवट येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



या शिबिरात पुणे, जालना, लातूर, वर्धा, यवतमाळ, किनवट, माहूर व हदगाव परिसरातील एकूण १४४ बालक सहभागी झाले होते. मुलींची लक्षणीय उपस्थिती होती. तसेच पालकांचा मोठा सहभाग आहे. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय ध्वज शिबीर संयोजक सहायक सीमा सरपोतदार यांच्या हस्ते तर राष्ट्र सेवा दलाचा ध्वज शिबिरार्थी पालक उमेश कुरसंगे यांच्या हस्ते फडकावून करण्यात आली. त्यानंतर प्रार्थना व पूज्य साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. रामप्रसाद तौर होते. यावेळी प्रकल्प संचालक तथा बालरोगतज्ज्ञ डॉ. योगेंद्र वरटकर यांनी प्रा. रामप्रसाद तौर यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार केला. राष्ट्र सेवा दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते व शिबीर प्रमुख प्रशिक्षक सदाशिव मकदूम यांचा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर यांनी शाल देऊन गौरव केला. याशिवाय सहप्रशिक्षक शौर्य भोसले, नागिनी दुल्ले, कोमल मकदूम, सीमा सरपोतदार यांचा सत्कार केला. शिबिरातील पालक व विद्यार्थ्यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

प्रास्ताविकात भारत जोडो युवा अकादमीचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे यांनी शिबिराच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. देशातील सध्याची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता चांगला माणूस, जबाबदार नागरिक आणि राष्ट्रप्रेमी घडविण्यासाठी अशा शिबिरांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक वर्षांपासून भारत जोडो युवा अकादमी व राष्ट्र सेवा दल या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या शिबिरांमधून घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

शिबीर प्रमुख प्रशिक्षक सदाशिव मकदूम यांनी राष्ट्र सेवा दलाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, ही संघटना लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांचा प्रचार-प्रसार करून तरुणांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, शिस्त, सेवाभाव आणि आत्मविश्वास विकसित करण्यासाठी कार्यरत आहे. महात्मा गांधी यांच्या शांतता व अहिंसेच्या विचारांवर आधारित सामाजिक परिवर्तन घडविण्याचे कार्य राष्ट्र सेवा दल करत असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्घाटक व अध्यक्ष प्रा. रामप्रसाद तौर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. शिबिरातून मिळणाऱ्या अनुभवांचा वैयक्तिक विकासासाठी उपयोग करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले, तर आभार अजय जाधव यांनी मानले.

# काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्याची सिडकोपासून होणार सुरुवात –प्रा. खा. रवींद्र चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील काँग्रेस संघटन मजबूत करण्याच्या अनुषंगाने व एसआयआर मोहीम यशस्वीपणे राबवून घेण्यासाठी लवकरच जिल्ह्यात अनेक ठिकाणी काँग्रेस मेळावे आयोजित करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत पहिला मेळावा सिडको येथे होणार आहे, त्यामुळे सिडकोत काँग्रेस संघटन अधिक व्यापक करावे, असे आवाहन दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले.

आगामी संघटनात्मक मेळाव्याच्या अनुषंगाने बुधवार, दि. ३ जून रोजी सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीची संघटन बैठक खा. रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफार यांनी देखील मार्गदर्शन केले. सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी संघटनात्मक कार्य आढावा देत बैठकीचे प्रास्तावित केले. या दरम्यान नवनिर्वाचित तिन्ही अध्यक्षांचा सिडको काँग्रेसच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रल्हाद गव्हाणे, डॉ. अशोक कलंत्री, ज्योती कदम, गोपीनाथ कहाळेकर, माणिक श्रोते, किशन रावणगावकर, लतिफ शेख, नरोद्दीन शेख, एस. पी. कुंभारे, प्रा. गणेश लिंगमपल्ले, भगवान जोगदंड, अजय गालेवाड, सोपान भुरे, अझर शेख, सचिन कानोडे, नईम शेख, चव्हाण काकू, प्रभू उरुद्दवाड आदींसह इतर प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन गौतम पवार यांनी केले. नाभिक समाजाचे नेते प्रा. गणेश लिंगमपल्ले, विद्यार्थी युवा नेतृत्व सचिन कानोडे, सामाजिक कार्यकर्ते नईम शेख आदी सिडकोतील पदाधिकाऱ्यांनी यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, सिडको ब्लाँक अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

CMYK

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# इंस्टाग्राम प्लस !; पैसे मोजून घ्या नवे फिचर्स

## स्टोरीज 48 तास फीडमध्ये राहतील... कोणी पाहिल्या व कोणी नाही हेही कळेल...

**इंस्टाग्राम प्लस हे कंपनीचे नवीन सशुल्क सबस्क्रिप्शन मॉडेल आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, शुल्क भरून अतिरिक्त वैशिष्ट्यांसह इंस्टाग्राम वापरण्याची ही एक संधी आहे. कंपनीने जगभरात इंस्टाग्राम प्लस लाँच केले आहे. हे विशेषतः अशा वापरकर्त्यांसाठी आहे ज्यांना ॲपवर अधिक नियंत्रण, सखोल माहिती आणि प्रीमियम वैशिष्ट्ये हवी आहेत. लक्षात ठेवा, काही दिवसांपूर्वीच मेटाने व्हॉट्स ॲप प्लसची घोषणा केली होती आणि आता ते इंस्टाग्राम प्लस आणत आहे.**




### कस्टम आयकॉन्स उपलब्ध

- कस्टम ॲप आयकॉन्स : तुम्ही इंस्टाग्राम आणि त्याच्या निर्मात्यांनी डिझाइन केलेल्या अद्वितीय संग्रहातून तुमचा आवडता ॲप आयकॉन निवडू शकता.
- कस्टम बायो फॉन्ट : तुम्ही तुमच्या वैयक्तिक शैलीनुसार तुमच्या प्रोफाइल बायोचा फॉन्ट बदलू शकता.
- अधिक प्रोफाइल पिन्स : खास आठवणी किंवा पोस्ट्स हायलाइट करण्यासाठी, तुम्ही आता तुमच्या प्रोफाइलवर ३ ऐवजी ६ पोस्ट्स पिन करू शकता.
- थेट प्रोफाइल पोस्ट्स : तुम्ही तुमच्या मित्रांच्या होम फीडमध्ये न दिसता, पोस्ट्स थेट तुमच्या प्रोफाइल किंवा हायलाइट्सवर शेअर करू शकता.

### इंस्टाग्राम प्लसची किंमत किती आहे?

इंस्टाग्राम प्लस जागतिक स्तरावर उपलब्ध होण्यास सुरुवात झाली आहे. कंपनीचे म्हणणे आहे की, पुढील काही महिन्यांत ते नवीन प्रीमियम टूल्स जोडणे सुरू ठेवतील. या प्लस सबस्क्रिप्शनची किंमत अमेरिका आणि इतर काही बाजारपेठांसाठी अंदाजे ३८० रुपये प्रति महिना निश्चित करण्यात आली आहे. तथापि, भारतासाठी अधिकृत किंमत अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

### मोफत वापरतात त्यांचे काय होईल?

इंस्टाग्राम नेहमीप्रमाणेच मोफत राहील. जे लाखो वापरकर्ते प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून ते डाउनलोड करतात, त्यांना काहीही पैसे द्यावे लागणार नाहीत. कंपनी आपली वैशिष्ट्ये कमी करत नाहीये. ती फक्त इंस्टाग्राम प्लस नावाची एक नवीन सेवा सादर करत आहे. ज्या वापरकर्त्यांना या वैशिष्ट्याचा अनुभव घ्यायचा आहे, ते शुल्क भरून सबस्क्राइब करू शकतात. त्या बदल्यात त्यांना अतिरिक्त वैशिष्ट्ये मिळतील. इंस्टाग्रामने दिलेल्या माहितीनुसार, कंपनीने सबस्क्रिप्शन वैशिष्ट्यांची तीन श्रेणींमध्ये विभागणी केली आहे.

### स्टोरी 48 तास लाईव्ह

- स्टोरी स्पॉटलाइट : यामुळे तुम्ही तुमच्या मित्रांच्या फीडमध्ये तुमच्या स्टोरीला प्राधान्य देऊ शकता.
- सुपर हार्ट्स : तुमच्या मित्रांच्या स्टोरीजचा आनंद साजरा करण्यासाठी तुम्ही ॲनिमेटेड हार्ट्स पाठवू शकता जे स्क्रीनवर फुटल्यासारखे दिसतील.
- मल्टिपल स्टोरी ऑडियन्सेस : तुम्ही तुमच्या आवडीनुसार प्रेक्षकांच्या अनेक याद्या तयार करू शकता, जेणेकरून तुमची स्टोरी फक्त योग्य लोकांपर्यंत पोहोचेल.
- स्टोरी एक्स्टेंड : यामुळे तुमची स्टोरी २४ तासांऐवजी पूर्ण ४८ तास लाईव्ह राहू शकते, ज्यामुळे लोकांना ती पाहण्यासाठी अधिक वेळ मिळतो.

### प्रीव्ह्यू आणि इनसाइट्स पहा...

- स्टोरी प्रीव्ह्यू : तुम्ही प्रतिक्रिया देण्याच्या दबावाशिवाय स्टोरीजचा प्रीव्ह्यू पाहू शकता.
- स्टोरी रिवॉच इनसाइट्स : तुमची स्टोरी किती वेळा पुन्हा पाहिली गेली आहे याचा तुम्ही मागोवा घेऊ शकता.



- प्रेक्षक यादी शोधा : तुमची स्टोरी पाहणाऱ्या लोकांच्या यादीत नाव शोधून, एखाद्या विशिष्ट व्यक्तीने तुमची स्टोरी पाहिली आहे की नाही हे तुम्ही पटकन तपासू शकता.

# गुगलवर वाढवा फॉलोअर्स !

## सर्च प्रोफाइल्स फीचर आहे काय..?



**गुगलवर तुमचे नाव सर्च व्हावे आणि तुमचे प्रभावी प्रोफाइल दिसावे असे तुम्हाला वाटते का ? तसे असल्यास, समजून घ्या की गुगलने तुमची विनंती ऐकली आहे. खरे तर, जर तुम्ही कंटेंट क्रिएटर, ब्लॉगर किंवा पब्लिशर असाल, तर गुगलने तुमच्यासाठी एक अद्भुत फीचर आणले आहे. याला सर्च प्रोफाइल म्हणतात आणि हे फीचर तुम्हाला तुमची ओळख आणि अस्तित्व सुधारण्याची संधी देईल.**

आतापर्यंत, तुमची सामग्री गूगल सर्च किंवा डिस्कव्हरवर कशी दिसेल हे मोठ्या प्रमाणावर अल्गोरिदमद्वारे ठरवले जात होते, परंतु आता या नवीन फीचरमुळे, तुमच्याकडे एक खास जागा असेल जिथे तुम्ही वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरील तुमची सामग्री एकाच ठिकाणी हायलाइट करू शकाल. हे फीचर लोकांना तुमच्याबद्दल अचूक आणि अद्ययावत माहिती शोधण्यास मदत करेल.

### नवीन गूगल सर्च प्रोफाइल फीचर काय आहे?

हे नवीन फीचर क्रिएटर्स आणि पब्लिशर्ससाठी एक केंद्र म्हणून काम करेल. येथे, तुम्ही तुमचे नवीन लेख, व्हिडिओ आणि सोशल मीडिया पोस्ट्स सर्व एकत्र प्रदर्शित करू शकाल. या फीचरचा सर्वात मोठा फायदा हा आहे की लोक तुम्हाला थेट फॉलो करू शकतील. जितके जास्त लोक तुम्हाला फॉलो करतील, तितकी तुमची सामग्री डिस्कव्हर फीडमध्ये दिसण्याची शक्यता जास्त असेल. अहवालानुसार, कोणत्याही प्रमुख सोशल मीडिया किंवा व्हिडिओ प्लॅटफॉर्मवर लक्षणीय चाहता वर्ग असलेले प्रकाशक किंवा क्रिएटर त्यांचे प्रोफाइल क्लेम करू शकतात आणि ते कस्टमाइझ करू शकतात. याव्यतिरिक्त, प्रोफाइल क्लेम केल्याने त्यांना गूगल नॉलेज पॅनल तयार करण्याची परवानगीदेखील मिळते. ज्यांच्याकडे आधीपासूनच नॉलेज पॅनल आहे, ते नवीन अवतार, नवीनतम कंटेंट आणि त्यांच्या प्रोफाइलच्या थेट लिंकसह ते आपोआप अपडेट करतील. हे वैशिष्ट्य सुरुवातीला अमेरिकेत लॉंच केले जात आहे. भविष्यात ते जागतिक स्तरावर आणले जाईल. कालांतराने नवीन वैशिष्ट्ये जोडली जातील. अहवालानुसार, गूगलचा विश्वास आहे की यामुळे लोकांना विश्वासार्ह आणि अस्सल क्रिएटर शोधणे सोपे होईल. याशिवाय, कंटेंट क्रिएटरना गूगल सर्च इंजिनवर ते जगासमोर कसे दिसतील यावर पूर्ण नियंत्रण मिळेल.

# एआय तुम्हाला गतीने हुशार बनवते तसेही मूर्खही बनवू शकते !; श्रीधर वेंबू यांचा विद्यार्थ्यांना मोठा इशारा

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) मदतीने, विद्यार्थी पूर्वीपेक्षा अधिक वेगाने समस्या सोडवू शकतात, असाइनमेंट लिहू शकतात आणि परीक्षेची तयारी करू शकतात. पण झोहोचे संस्थापक श्रीधर वेंबू म्हणतात, की या सोयीसाठी एक किंमत मोजावी लागू शकते, जी बहुतेकांपासून लपलेली असते. अलीकडेच, UC बर्कलेमध्ये कॉम्प्युटर सायन्सच्या एका कोर्समध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी नापास झाले. या बातमीवर प्रतिक्रिया देताना, वेंबू म्हणाले की, जे विद्यार्थी एआयवर (AI) जास्त अवलंबून राहतात, ते ती कौशल्य धोक्यात आणत आहेत, जी त्यांना स्वतः विकसित करायची आहेत... वेंबूंचा विद्यार्थ्यांना दिलेला इशारा भविष्यातील एका संकटाकडे सूचित करतो. ChatGPT, Gemini आणि Cloud सारखी एआय साधने वर्गांमध्ये आणि अभ्यासाच्या नित्यक्रमात अधिकाधिक वापरली जात आहेत. हे प्लॅटफॉर्म त्वरित उत्तरे आणि स्पष्टीकरणे देऊ शकतात, परंतु वेंबूंचा विश्वास आहे की विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर जास्त अवलंबून राहण्यापूर्वी आपली मूलभूत समज विकसित आणि मजबूत केली पाहिजे. वेंबूंनी त्यांच्या अधिकृत X खात्यावरून ट्विट केले की, एआय तुम्हाला लवकर हुशार बनवू शकते, पण तितक्याच लवकर मूर्खही बनवू शकते. द डेली कॅलिफोर्नियनमधील एका अहवालानुसार, स्प्रिंग २०२६ सत्रादरम्यान UC बर्कले येथील अनेक संगणक विज्ञान अभ्यासक्रमांमध्ये नापास होण्याचे प्रमाण असामान्यपणे जास्त असल्याचे आढळले आहे. या अहवालानंतर वेंबू यांनी हा इशारा दिला आहे. वेंबू यांनी एआय (AI) बद्दल इशारा देण्याची ही पहिली वेळ नाही. त्यांनी यापूर्वी अशा संशोधनाचा हवाला दिला होता, ज्यात असे दिसून आले होते की एआय अल्पकालीन कामगिरी सुधारू शकते, परंतु ते दीर्घकालीन शिक्षणाला हानी पोहोचवू शकते.

# अजब-गजब





# उडत्या विमानावर साहसी कारनामा... पती-पत्नी मृत्यूच्या दारात !

टेक्सास (अमेरिका) : अनेक एयर शोमध्ये आपल्या साहसी कारनाम्यांनी सर्वांना अचंबित करणारे काएले आणि अमांडा फ्रँकलिन हे स्टंट पायलट्स पती- पत्नी सध्या मृत्यूच्या दारात असून, टेक्सासमध्ये आयोजित एयर शोमध्ये झालेल्या अपघातात ते ६० टक्के भाजले आहेत. सध्या त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. ब्राऊन्सविले शहरात हा एयर शो सुरू होता. शोमध्ये काएले आणि अमांडा दोघेही प्लेनच्या पंखावर चालण्याचे साहस करत होते. अशातच प्लेनच्या इंजिनला आग लागली. प्लेन रण-वेवर क्रॅश झाले. या अपघातात दोन्ही पती- पत्नी गंभीर जखमी झाले. प्लेन क्रॅश होण्याआधी दोघेही प्लेनमध्ये पोहचले होते. त्यामुळे त्यांचा जीव वाचला आणि ते केवळ आगीत होरपळले. दोघांना तातडीने हॉस्पिटलमध्ये पोहचविण्यात आले. सूत्रांनी सांगितले, की अमांडा आणि काएले यांची भेट २०२० मध्ये एका एयर शोमध्येच झाली होती. वर्षभर प्रेमात राहिल्यानंतर २०२१ मध्ये त्यांनी लग्न केले. काएले गेल्या पाच वर्षांपासून अशा प्रकारचे साहसी कारनामे करत आहे. पण पहिल्यांदाच त्याच्यासोबत अशा प्रकारचा अपघात झाला. काएले आणि अमांडाच्या बाबतीत इतिहासाची पुनरावृत्ती झाल्याचे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी सांगितले. स्टंट पायलट पिताही हवेत प्लेनच्या टकरीमुळे मारले गेले होते. सध्या काएले आणि अमांडाची प्रकृती स्थिर असली तरी अजूनही त्यांच्या जिवाला धोका कायम असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# 82 वर्षांची सुपरमॉडेल !



लंडन : मॉडेल म्हटलं की डोळ्यांसमोर उभी राहते एखादी तिशीच्या आतील सुंदर तरुणी. पण इंग्लंडच्या ८२ वर्षीय डेफ्ने सैल्फी या म्हातारीने मॉडेलची ही ओळखच बदलून टाकली आहे. मॉडेलिंगचा मक्ता काय केवळ तरुणींनीच घेतलाय का, असा प्रश्न करत त्यांनी या वयात मॉडेल म्हणून काम करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. विशेष म्हणजे म्हातारीला कोण देणार आहे काम, असे आपल्याला वाटत असेल तर तो समजही मनातून काढून टाका. कारण आजीबाईला भरपूर कामही मिळाले आहे. जितके तरुणपणात मिळाले नव्हते तितके..!

एक यशस्वी मॉडेल म्हणून सध्या डेफ्ने यांच्याकडे बघितले जात आहे. चार मुलांची आजी असलेल्या डेफ्ने या गेल्या ६० वर्षांपासून फॅशन इंडिस्ट्रीशी संबंधित आहेत. रिडिंग शहरात राहणाऱ्या डेफ्ने यांनी आतापर्यंत निविया, ओलेसह अनेक नामांकित डिझायनर कंपन्यांकरिता मॉडेलिंग केली आहे. याशिवाय व्होग आणि मारी क्लेइरे सारख्या फॅशन मॅगझिनमध्येही त्यांची छायाचित्रे छापून आली आहेत. १९६४ मध्ये २० वर्षांच्या असताना त्यांनी आपल्या मॉडेलिंग करिअरला सुरुवात केली होती. सर्वप्रथम त्यांनी एका स्थानिक मॉडेलिंग स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धेत विजेती म्हणून घोषित झाल्यानंतर त्यांचा आत्मविश्वास दुणावला आणि त्यांनी मॉडेलिंगमध्येच करिअर करण्याचे ठरवले.

# स्वप्न जगातील सर्वांत वजनदार महिला होण्याचे !

न्यूजस : वजन आटोक्यात असावे आणि मैत्रिणींनी काय स्वतःला मेन्टेन केलेस गं, अशी विचारणा करावी, असे प्रत्येक महिलेला वाटत असते. त्यासाठी त्या तासन् तास जिमध्ये जातात, डाएटिंग करतात... पण न्यूजस येथील एक महिला सर्व महिलांपेक्षा जरा हटके आहे. तिला शरीर बारीक नाही तर जाड व्हावे, असे वाटते. सध्या ती आहे २७३ किलोंची आणि तिला व्हायचे ४५५ किलोंचे. यासाठी ती प्रयत्न करत आहे... डोना सिमसन असे या ४४ वर्षीय महिलेचे नाव आहे. तिने २०२४ मध्ये मुलाला जन्म दिला तेव्हा ती जगातील सर्वांत वजनदार माता ठरली होती. त्यानंतर तिने वजन वाढविण्याचा सपाटाच लावला. डोना सध्या रोज १२ हजार कॅलरीजचे जेवण करते. मात्र ती संतुष्ट नाही. तिला जगातील सर्वांत वजनदार महिला बनायचे असल्याने त्यादृष्टीने तिचे प्रयत्न सुरू आहेत. ती सतत काही ना काही खात असते. डॉक्टरांनी तिच्या या विचित्र इच्छेबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, असेच वजन वाढत राहिले तर एक दिवस डोनाला प्राणही गमवावा लागू शकतो. पण डोनाला मरणाची चिंता नाही. काही केल्या वजनदार महिलेचा किताब पटकावयाचाच, असा निर्धार तिने केला आहे. तिने आपली वेबसाईटही सुरू केली असून, त्यावर लोक तिच्या वाढत्या वजनाची माहिती घेऊ शकतात.



# 13 नंबरचे घर वाजवू शकते आपले तीनतेरा !

लंडन : लंडन येथील जुपला नावाच्या प्रॉपर्टी वेबसाईटने सर्वांनाच धक्का देईल, असे संशोधन घराच्या बाबतीत केले आहे. त्यांच्या मते, १३ नंबर हा घरासाठी अनलकी ठरू शकतो. थोडक्यात म्हणजे, १३ नंबर आपल्या आयुष्याचे पार तीनतेरा वाजवून टाकतो. घराचा नंबर १३ असेल किंवा पत्त्यात १३ हा आकडा असेल तर भविष्यात मोठे नुकसान सोसावे लागू शकते, असे या वेबसाईटने म्हटले आहे. आर्थिक नुकसान तर होतेच, पण कुटुंबातही कायम भांडणे सुरू असतात व त्यामुळे घराची शांती भंग पावते, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हा निष्कर्ष काढण्यासाठी जुपला वेबसाईटने ४ हजारांवर कुटुंबे विचारात घेतली.




# 23 प्रवाशांना घेऊन रेल्वेच्या वेगात धावते कार..!

दुबई : जर आपले कुटुंब मोठे आहे किंवा आपल्याला १५ ते २० मित्रांना घेऊन कुठे फिरायला जायचे आहे तर बस किंवा ट्रेनचाच आधार घ्यावा लागतो. पण अशा प्रवासात प्रवासाचा आनंद लुटता येत नाही. मात्र आता एक अशी कार तयार झाली आहे, ज्यात एकाच वेळी २३ लोक बसून प्रवास करू शकतात. या कारचा वेग इतका प्रचंड आहे की रेल्वेलाही मागे टाकेल. १५५ किलोमीटर प्रतितास इतका कारचा वेग आहे. १५ फूट लांब असलेल्या या कारला इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ पब्लिक ट्रान्सपोर्टच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनीत नुकतेच सादर करण्यात आले होते. कारला सुपर बस असे नाव देण्यात आले आहे. तिला सहा चाके आणि १२ दरवाजे आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ही कार लिथियम बॅटरीने चालते. कारची निर्मिती टी. यू. डेल्फ्ट युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नोलॉजीच्या अभियंत्यांनी केली आहे. कारमध्ये प्रवाशांकरिता सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. टीव्हीशिवाय इंटरनेटचाही आनंद कारमध्ये घेता येतो. दुबई सरकारने या कारला मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच ती बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. मोठमोठे उद्योगपती, अधिकारी या कारला खरेदी करतील, असे कार निर्माण करणाऱ्या अभियंत्यांना वाटत आहे.

# अमेरिकेने मोदींवर दबाव टाकणे व्यर्थ; आमच्या भागीदारीवर परिणाम होणार नाही -पुतिन

**सेंट पीटर्सबर्ग (वृत्तसंस्था)** – रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी म्हटले आहे की, अमेरिका भारतावर रशियासोबतच्या त्याच्या संबंधांसह अनेक मुद्द्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे, पण असे प्रयत्न निरुपयोगी आहेत. भारत याचा विरोध करेल.



पुतिन यांनी पीटीआयसह जगातील प्रमुख वृत्तसंस्थांच्या प्रमुखांशी संवाद साधताना भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुकही केले. ते म्हणाले- भारत एक महान देश आणि लोकशाही आहे. रशिया त्याला आपला विश्वासार्ह भागीदार मानतो. रशियन अध्यक्षांनी पुढे म्हटले- भारत आपल्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देतो. अमेरिकेशी त्याचे वाढते संबंध असले तरी भारत-रशियाच्या भागीदारीवर कोणताही परिणाम होणार नाही. रशियासोबतचे त्याचे संबंध पूर्वीसारखेच मजबूत राहतील. पुतिन म्हणाले- आम्हाला आनंद आहे की भारत त्या सर्व देशांशी संबंध वाढवत आहे, ज्यांना तो आपल्या राष्ट्रीय हितासाठी आवश्यक मानतो. पुतिन यांनी विश्वास व्यक्त केला की येत्या काही वर्षांत भारत आणि रशियामधील व्यापार १०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल. ते म्हणाले- भारत जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि सर्वात वेगाने वाढणाऱ्या देशांमध्ये गणला जातो. ही उपलब्धी अचानक मिळालेली नाही, तर पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारच्या अथक प्रयत्नांचे आणि धोरणांचे ते परिणाम आहे.

रशियन अध्यक्षांनी सांगितले की, काही पाश्चात्त्य देशांनी भारतावर रशियासोबतचे सहकार्य कमी करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, आता सर्वांना समजले आहे की पंतप्रधान मोदी आणि भारतावर दबाव आणणे आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी हानिकारक ठरेल. पुतिन यांचे हे विधान भारत दौऱ्यापूर्वी आले आहे. ते पुतिन १२ आणि १३ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या BRICS परिषदेत सहभागी होतील. भारत यावर्षी BRICS चे अध्यक्षपद भूषवत आहे. एका वर्षाच्या आत पुतिन यांचा हा दुसरा भारत दौरा असेल. पंतप्रधान मोदीही याच वर्षी रशिया दौऱ्यावर जातील. रशियन अध्यक्ष २३व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ४ डिसेंबर २०२५ रोजी भारतात आले होते. युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर पुतिन यांचा हा पहिला भारत दौरा होता. यापूर्वी ते शेवटचे २०२१ मध्ये भारतात आले होते.

# मणिपूरमध्ये हिंसाचार, महिलेसह तिघांची हत्या

**कांगपोकपी (वृत्तसंस्था)** – मणिपूरमधील कांगपोकपी जिल्ह्यातील सैतु-गाम्फाजोल उपमंडळातील लोइबोल खुल्लेन गावात शुक्रवार ५ जून २०२६ रोजी पहाटे हिंसाचार उसळला. या हिंसाचारात एक महिला, तिचा पती आणि एक अन्य व्यक्ती अशा तीन जणांची हत्या झाली. सशस्त्र हल्लेखोरांनी तिघांची हत्या केली. तसेच हल्लेखोरांनी काही घरांना आग लावली. एकूण सात घरं जळून खाक झाली.

दोन गटांच्या हिंसक संघर्षाची तीव्रता वाढू लागल्याचे बघून अनेकांनी जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलात लपून राहणे पसंत केले. गावात काही काळानंतर शांतता पसरली. यानंतर धाडस करून पुढे आलेल्या स्थानिकांनी हत्या झालेल्या



तिघांची ओळख पटवली आहे. लेतखोंगाम हाओकिप, टिनमेरी हाओकिप आणि जांगमिनलाल हाओकिप यांची हत्या झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. हल्लेखोरांनी गोळीबार केला. या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

गावातील हिंसेचा कुकी इनपी मणिपूर या संघटनेने जाहीर निषेध केला आहे. मारेकऱ्यांना शोधून अटक करावी आणि कठोर शिक्षा करावी अशी मागणी केआयएमने केली आहे. निरपराध आणि निःशस्त्र व्यक्तींवर हल्ला करणे आणि त्यांची हत्या करणे हे निषेधार्ह कृत्य आहे. या कृत्याचे कधीही समर्थन होऊ शकत नाही. सामान्यांची हत्या करणारे मानवाधिकारांचे उल्लंघन करत आहेत, असेही कुकी इनपी मणिपूर या संघटनेने सांगितले.

# पुण्यात गॅस सिलिंडरचा स्फोट, आई-वडीलांसह मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी)** – पुण्यामध्ये गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. या स्फोटामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आई-वडील आणि मुलाचा समावेश आहे. स्फोट झाला त्यावेळी मुलाचा जागीच मृत्यू झाला. तर आई-वडिलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गॅस सिलिंडर बदलत असताना नोझलमधून गॅस गळती होऊन भीषण स्फोट झाला. पुण्यातील खांदवे नगरमधील एका इमारतीत पहिल्या मजल्यावर ही घटना घडली.



पुण्यातील खांदवेनगर येथील इमारतीमध्ये राहणारे पांडुरंग गित्ते यांच्या घरामध्ये ही घटना घडली. गॅस सिलिंडर लावताना भयंकर स्फोट झाला. या स्फोटामध्ये पांडुरंग यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांचे वडील विष्णू गित्ते आणि आई वृंदाविनी गित्ते हे गंभीर जखमी झाले होते. तर त्यांची पत्नी राजश्री गित्ते आणि मुलगी निहारिका पांडुरंग गित्ते (वय ५ वर्षे) हे किरकोळ जखमी झाले होते. त्यांच्या आई-वडिलांवर ससून रुग्णालयात उपचार सुरू होते. दोघांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी सांगितले की, खांदवेनगर परिसरातील फॉर्च्यून सिटीमधील एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील स्वयंपाकघरात गॅस सिलिंडर संपल्यानंतर नवीन सिलिंडर जोडण्याचे काम सुरू होते. त्यावेळी सिलिंडरच्या नोझलमधून मोठ्या प्रमाणात गॅस गळती झाली. घरातील देवघरात दिवा सुरू होता. गॅस घरात पसरल्याने आग लागली आणि नंतर स्फोट झाला. या स्फोटात पांडुरंग त्यांचे वडील विष्णू आणि आई वृंदाविनी गंभीर भाजल्या. तर पांडुरंग यांच्या पत्नी राजश्री या आंघोळ करीत असल्याने त्या बचावल्या. तर त्यांची ५ वर्षांची मुलगी निहारिका ही बाल्कनीमध्ये होती. नागरिकांनी तिला बाल्कनीमधून उडी मारण्यास सांगितले. तिने उडी मारल्यानंतर नागरिकांनी तिला खाली झेलले. ती किरकोळ भाजली.

# स्कॉर्पिओच्या धडकेत चिमुरडीसह चौघांचा मृत्यू

**जळगाव (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील वरणगावजवळ मुंबई-नागपूर महामार्गावरील बायपासवर एक अत्यंत थरारक आणि भीषण रस्ते अपघाताची घटना समोर आली आहे. एका भरधाव स्कॉर्पिओ वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या काळीज चिरणाऱ्या अपघातात एक महिला आणि चिमुरड्या बालकासह एकूण चौघांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीवरील चौघांचाही जीव गेला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर येथील एकाच आदिवासी पारधी कुटुंबातील हे चारही सदस्य होते. हे सर्वजण दुचाकीने वरणगाव येथे लस्सी पिण्यासाठी जात असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली.

गावाच्या काहीसे पुढे जात असतानाच समोरून येणाऱ्या एका अनियंत्रित भरधाव स्कॉर्पिओ वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर झाला असून, घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी तात्काळ धाव घेत दुचाकीची ओळख पटवली आणि त्यांच्या नातेवाईकांना या घटनेची माहिती दिली.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांच्या मदतीने सर्व जखमींना तातडीने जळगाव जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती तिघांना मृत घोषित केलं, तर चौथ्या व्यक्तीचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दुर्घटनेत विजय शंकर काळे (वय १९ वर्षे) : दुचाकी चालवणारा तरुण, ज्याचा या अपघातात मृत्यू झाला. ऐश्वर्या बहाद्दूर भोसले (वय ३० वर्षे), विघ्नेश शंकर चव्हाण (वय १४ वर्षे), मोनालिसा शिवबसप्पा भोसले (वय १ वर्ष) यांचा मृत्यू झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच जळगाव पोलिसांनी तातडीने शासकीय रुग्णालयात धाव घेतली. पोलिसांनी मृतकांच्या नातेवाईकांची विचारपूस करून त्यांची समजूत काढण्याचा आणि त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. अपघातानंतर संबंधित स्कॉर्पिओ वाहनचालकाविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करून आम्हाला न्याय मिळावा, अशी आग्रही मागणी संतप्त नातेवाईकांनी केली आहे.

# पोलीस भरतीचा सराव करताना युवतीचा मृत्यू

**जालना (प्रतिनिधी)** – जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. लहानपणापासून एकचं स्वप्न होत ते म्हणजे पोलीस भरती. त्यासाठी दिवस रात्र मेहनत करणं हेच कधी जीवावर बेतू शकतं अशी कल्पना पण नाही करू शकत. आपण जे विचार पण नाही करू शकत ते प्रत्येक्ष जेव्हा आपल्या समोर घडतं तेव्हा आपल्या पायाखालची जमिन सरकते. अशीच एक घटना जालना जिल्ह्यात घडली आहे. प्रीती काशीराम भाकड (वय वर्ष १९) नेहमी प्रमाणे सरावासाठी ती घरातून बाहेर पडली पण हा दिवस तिच्या साठी शेवटचा असेल असे तिने कधी स्वप्नात पण पाहिलं नसेल.



पोलीस भरतीसाठी ती नेहमी प्रमाणे शहरापासून काही अंतरावर असलेल्या वळवंडा शिवारातील एका पाण्याने भरलेल्या खदानीच्या परिसरात गेली होती.नेहमी प्रमाणे सराव सुरू झाला.संचालक आणि प्रशिक्षक ह्यांच्या उपस्थितीमध्ये हा सराव सुरू होता. सराव सुरू असताना अचानक प्रीती चा पाय सरकला आणि ती खदानीच्या खोल पाण्यात पडली. प्रीती पाण्यात पडताच लगेच आरडाओरडा झाला काहींनी पाण्यात उतरून तिला वाचवण्याचा प्रयत्न केला परंतु खोल पाण्यात गेल्यामुळे श्वास गुदमरून तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी निष्काळजीपणाचा ठपका ठेवत खदानीचे संचालक आणि प्रशिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

माहिती पोलिसांना मिळताच अंबड पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने वळवंडा शिवारातील घटनास्थळी धाव घेतली . वळवंडा शिवारातील ग्रामस्थांच्या मदतीने प्रीतीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेह तात्काळ शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. प्रीतीच्या मृत्यूची बातमी समजताच तिच्या कुटुंबियां मोठा धक्का बसला. संपूर्ण अंबड शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# इंडिगोची ६ देशांतील उड्डाणे तात्पुरती स्थगित

**मुंबई (प्रतिनिधी)** – देशातील आघाडीची एअरलाइन खपवळक्रेने आपल्या काही आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये तात्पुरती कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीच्या अधिकृत निवेदनानुसार, १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत निवडक आंतरराष्ट्रीय मार्गांवरील उड्डाणांची संख्या कमी करण्यात येणार आहे. तसेच लंगकाव, क्राबी, हो चि मिन्ह सिटी, हाँगकाँग, शांघाय आणि सिएम रीप या शहरांसाठीची उड्डाणे ३ जुलै ते ३० सप्टेंबरदरम्यान पूर्णपणे स्थगित राहतील.



एअरलाइनने म्हटले आहे की, या मार्गांसाठीचे बुकिंग १ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होईल. मात्र, बाजारातील परिस्थिती आणि प्रवासी मागणी सुधारल्यास सेवा त्यापूर्वीही सुरू केल्या जाऊ शकतात. या बदलांनंतरही इंडिगोची १,८०० हून अधिक साप्ताहिक आंतरराष्ट्रीय उड्डाणे नियमितपणे सुरू राहणार आहेत. कंपनीच्या मते, सध्याची मागणी, वाढता ऑपरेशनल खर्च आणि हवाई क्षेत्रावरील निर्बंध लक्षात घेऊन क्षमता संतुलित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रभावित प्रवाशांना थेट माहिती दिली जाणार असून प्रवासापूर्वी आपला फ्लाइट स्टेटस तपासण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

इंडिगोने जुलै-सप्टेंबर तिमाहीसाठी आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये ही तात्पुरती कपात केली असून संबंधित मार्गांवरील सेवा १ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# शासकीय जमीन हस्तांतरण, पुनर्विकासाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना–महसूलमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास आणि वापरात बदल मंजुरीचे राज्य शासनाचे अधिकार आता थेट जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त स्तरावर विकेंद्रित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार हा बदल झाला आहे. यामुळे प्रशासन गतिमान तर होईलच शिवाय जनतेचा पैसा, वेळ , प्रवास यामुळे वाचेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे शासकीय आदेशाच्या स्वरुपातले परिपत्रक काढण्यात आले आहे.



शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त एफएसआय किंवा टीडीआर वापरण्यासाठी आतापर्यंत जनतेला मंत्रालयाची मान्यता लागत असे. आता हे पूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्यामुळे स्थानिक पातळीवरच फायलींचा वेगाने निपटारा होईल. प्रशासकीय गतिमानता वाढवण्यासाठी पूर्वीच्या २८ डिसेंबर २०१५ आणि १७ सप्टेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचना रद्द करण्यात आल्या आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिमान प्रशासनाच्या संकल्पनेतून शासकीय जमीन हस्तांतरण, पुनर्विकासाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. क्षेत्रीय पातळीवरील अधिकाऱ्यांना अधिकार दिल्यामुळे नागरिकांना आणि विकासकांना मंत्रालयाच्या फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. यामुळे विकासकामांना मोठी गती मिळेल.


## किरायाणे देणे आहे

वसंतनगर नांदेड येथील सुसज्ज दोन मजली इमारत किरायाणे देणे आहे. एकूण १६ रूम, संडास-बाथरूम, २४ तास पाण्याची सोय, सर्व सोईंनी युक्त इमारत, हॉस्टेल, दवाखाना व कोचिंग क्लासेससाठी किरायाणे देणे आहे.

– संपर्क नंबर–
९७६७४४०९३३, ७८२३८६७१३७,
९७६४८३१३६०

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## Change In Name

My old name is **Aditi Dishank Mhaske** Which now I am Changing as new Name **Aditi Ramesh Sonule.** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same.

**Address - Aditi Ramesh Sonule**
**D/o. Ramesh Sounle**
**Address - Boudwada, VTC Hadgaon**
**Dist. Nanded 431912 Mo.No. 8830884085**

## Change In Name

MY OLD NAME IS KAUSAR WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME KAOSAR BEE SHAIKH AYYUB HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME.
PLEASE CONSIDER THE SAME.
ADDRESS:NAVI ABADI, BHOKAR ROD, MUDKHED TQ. MUDKHED, DIST. NANDED -431806

## Change In Name

MY OLD NAME IS SHAIKH AYUB SHAIKH MAHEMOOD WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME SHAIKH AYYUB SHAIKH MAHEMOOD HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.
ADDRESS : NAVI ABADI, BHOKAR ROD,
MUDKHED TQ. MUDKHED,
DIST. NANDED -431806

## श्री साई शिक्षण संस्था मा. व मुलांचे वसतिगृह खतगाव ता. बिलोली जि. नांदेड

**मोफत प्रवेश देणे चालू आहे**

सन २०२६-२७ साठी या चालू शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात शासन नियमाप्रमाणे मोफत प्रवेश देणे चालू आहे. खालील प्रमाणे जातीनिहाय टक्केवानुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | भटक्या विमुक्त जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग | ५ टक्के |

नोट - एकूण विद्यार्थी संख्या ४५ + ९ = ५४
वरील वर्गवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे. तरी गरजू विद्यार्थ्यांनी त्वरीत प्रवेश घ्यावा.

**अधिक्षक** **संस्थापक**
**श्री साई शिक्षण संस्था मा. व मुलांचे वसतिगृह खतगाव ता. बिलोली जि. नांदेड**

## आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ वाळक्याची वाडी ता. हिमायतनगर, जि. नांदेड

**मोफत प्रवेश देणे चालू आहे**

शासन मान्य सामाजिक न्याय विभाग समाज कल्याण जि.प. नांदेड अंतर्गत अनुदानित वसतिगृहात सन २०२६-२७ साठी या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देणे चालू आहे. खालील प्रमाणे जातीनिहाय टक्केवानुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | भटक्या विमुक्त जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | बिगर मागास आर्थिक दुर्बल घटक | ५ टक्के |

नोट - १) भव्य व सुसज्ज इमारत, २) निवास व जेवणाची उत्तम सोय, ३) पिण्याचे फिल्टर पाणी, ४) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष, अभ्यासाचे वेळापत्रक

**अध्यक्ष** **अधिक्षक**
**मो. ९४२०९१३६१२**
**आदिवासी विद्यार्थी वसतिगृह हिमायतनगर, किनवट रोड, उमर चौक, हिमायतनगर जि. नांदेड**


## जाहिर प्रगटन

संचिका क्रं.NT/01/13744/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी

प्रकरण:-नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहिर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौसुरेश राणबा जोंधळे रा. म्हाळजा. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 म्हाळजानांदेड सर्व्हे नं. 03, 04पैकी औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) च्या 210 गाळे एल.आय.जी. या योजनेतील गाळा क्रं.109पिन क्र. 4020114280 श्री/सौ. भाग्यलक्ष्मी रामकिशन करमपुरी यांच्या नावेअसलेलीमालमता यांचेकडुन अर्ज खरेदीखत क्रं. 2072 दि.20.02.2026च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-
पुर्व :- 4.5 मी. रुंद रस्ता आहे.
पश्चिम :- टी.नं. 114 आहे.
दक्षीण :- टी.नं.108आहे.
उत्तर :-टी.नं.110आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७९१७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# शिक्षकांच्या डीजिटल सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषद व विद्यापीठाचा अभिनव उपक्रम

## ‘प्रोजेक्ट-एआय सारथी’चा शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील गणितीयशास्त्र संकुल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या पुढाकाराने तसेच नांदेड जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या प्रोजेक्ट एआय-सारथी : कॅपॅसिटी बिल्डिंग इन डिजिटल पेडॅगॉजी अँड एक्सपिरिएन्शियल लर्निंग फॉर झेडपी एज्युकेटर्स या दोन दिवसीय कार्यकारी विकास कार्यक्रमास आज उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला.



विद्यापीठाच्या प्रशिक्षण केंद्रात आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, शिक्षण अधिकारी वंदना फुटाणे, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. शैलेश वडेर, आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी तसेच गणितीय शास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. रुपाली जैन यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. ५ व ६ जून २०२६ रोजी आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल अध्यापन पद्धती आणि अनुभवाधारित शिक्षण याबाबत अद्ययावत ज्ञान व कौशल्ये प्रदान करणे हा आहे. या उपक्रमाद्वारे शिक्षकांच्या अध्यापन क्षमतांमध्ये वाढ होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर शिक्षण प्रक्रियेत करता येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. तसा सामंजस्य करार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व नांदेड जिल्हा परिषद यांच्यात शुक्रवार, दि. ५ जून रोजी करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले की, प्रोजेक्ट एआय-सारथी हा उपक्रम शालेय शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाधारित नवकल्पनांना चालना देणारा आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना लहान वयातच कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान मिळण्यास मदत होईल. महाराष्ट्रात अशा प्रकारचा स्थानिक जिल्हा परिषदेसोबत सामंजस्य करार करून अशा प्रकारचे उपक्रम राबविणारे स्वारातीम विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ असून, या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन समाज, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी भविष्यात अशा अनेक प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सांगितले की, संपूर्ण जिल्ह्यातून निवडक ५० शिक्षकांची या प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. या शिक्षकांनी दोन दिवसांच्या प्रशिक्षणातून कृत्रिम बुद्धिमत्तेचे अद्ययावत ज्ञान आत्मसात करून ते आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे, अशी अपेक्षा आहे.

## नरहर कुरुंदकर संशोधनवृत्तीसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** – नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने दरवर्षी संशोधनवृत्ती देण्यात येतात. सामान्यत: भाषाविषय, सामाजिक शास्त्रे व इतर सामाजिक प्रश्नांचा शोध घेणाऱ्या संशोधकांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने या संशोधनवृत्ती दिल्या जातात.आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे संशोधन करणाऱ्या स्वयंप्रेरित संशोधकांना प्राधान्य देण्यात येते. त्यासाठी शैक्षणिक पात्रतेची किंवा व्यवसायाची कुठलीही अट नाही. ही संशोधनवृत्ती म्हणजे पीएच. डी. पदवीसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिपच्या स्वरूपातली नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविण्यात आले आहे.

२०२६ - २७ या वर्षासाठी संशोधनवृत्ती देण्यात येणार असून, इच्छुक संशोधकांनी आपल्या संशोधनविषयाचे प्रारूप, प्रकल्पासाठी लागणारा खर्च व बायोडेटा असलेले प्रस्ताव दोन प्रतींमध्ये दि. ३० जून २०२६ पर्यंत नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्र, नरहर कुरुंदकर स्मारक, सायन्स कॉलेज जवळ, नांदेड-४३१६०५ पत्त्यावर पाठवावेत. तज्ज्ञ समितीच्या शिफारशीने संशोधकांची निवड केली जाईल. संशोधकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. यशवंत जोशी यांनी केले आहे.

# प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी ‘कर्मचारी समाधान शिबिराचे’ आयोजन

## कर्मचारी समाधान शिबिरासाठी माहिती तत्काळ सादर करा -जिल्हाधिकारी



**नांदेड (प्रतिनिधी)** – शासन सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी तातडीने आणि कार्यक्षमतेने सोडवण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी ‘कर्मचारी समाधान शिबीर’ आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व विभाग प्रमुखांनी कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अर्जाची माहिती कर्मचारी समाधान शिबीर विवरणपत्र अ व ब तत्काळ भरुन सादर करण्याचे निर्देश दिले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, विविध विभागाचे प्रमुख व प्रतिनिधी यांची उपस्थिती होती.

तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली हे शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावरील अडचणी जिल्हाधिकारी कार्यालयातील तर तालुकास्तरावरील अडचणी तहसील कार्यालयातील आणि विभागीय पातळीवरील अडचणी या विभागीय आयुक्त कार्यालयातील शिबिरात स्वीकारण्यात येणार आहेत. अर्जदार अधिकारी/कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी यांना शिबिरास उपस्थित राहून कर्मचाऱ्यांना समस्या मांडण्याचे आवाहन करण्यात येणार आहे

अनेकदा कर्मचाऱ्यांना वेतन, पदोन्नती, रजा, निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिका अद्ययावत करणे यांसारख्या वैयक्तिक कामांसाठी प्रशासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागतात. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी विभाग, जिल्हा आणि तालुका पातळीवर या शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेश दिले आहेत. जर पहिल्या शुक्रवारी सुट्टी असेल, तर त्यापूर्वीच्या कामकाजाच्या दिवशी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यालयामध्ये कर्मचारी यांची सेवाविषयक प्रलंबित प्रकरणांची यादी अद्ययावत करून तिचा त्या त्या शिबिरात समावेश करण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण होऊन प्रशासकीय कामात गती येईल. सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, कामात दिरंगाई करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली.

पान १ वरून...

**नांदेड तालुक्यातील एकूण ६५...**

तर बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता: ब्राम्हणवाडा, सुगाव बु., वाडी बु., वाडी पुयड, भनगी, पोखर्णी, चिखली बु., पासदगाव/पासदगावतर्फे काकांडी, बाभुळगाव, थुगांव, राहेगाव. दुपारी ३ वाजता: त्रिकूट/वाडी झांजी, सुगांव खु., कासारखेडा, वाजेगाव, विष्णुपुरी, ढोकी, लिंबगाव, मरळक खु./मरळक बु., गोपाळचावडी, वानेगाव/वरखेड/भानपूर, किकी.

गुरूवार, दि. ११ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता: गाडेगाव, कामठा खु., रहाटी बु., वाघी, वांगी/वाडी करडेल, खुपसरवाडी, धानोरा, धनेगाव/मुजामपेठ पिंपळगाव नि., तुप्पा, सायाळ, काकांडीतर्फे तुप्पा. दुपारी ३ वाजता: जैतापूर, कोटतीर्थ, वडगांव, गंगाबेट, वाहेगाव, धनगरवाडी, पिंपरी महिपाल, गुंडेगाव, कल्हाळ, दर्यापूर.

ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण सोडतीच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहुन, आरक्षण सोडत कार्यक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांनी केले आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ४ हायवा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याचा नुकताच पदभार घेतल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी आपल्या अन्य सहकाऱ्यांसोबत बेटसांगवी ते सोनखेड रस्त्यावरून अवैध वाहतूक करणारे विना नंबरचे चार हायवा वाळूसह जप्त केले. यावेळी पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जवळपास एक कोटी ८१ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून दिनांक ४ जून २०२६ रोजी सकाळचे ५ ते ७ वाजताच्या दरम्यान सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे आणि पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे आणि अंमलदार हे पेट्रोलींग करीत असताना पेट्रोलींग दरम्यान दगडगाव मार्गे बेटसांगवीकडून सोनखेडकडे चार विनानंबर हायवा वाहने जात होती. त्या वाहनांचा पाठलाग करून काही अंतरावर थांबवून पाहणी केली असता प्रत्येक वाहनात पाच ब्रास वाळू दिसून आली. सदर वाळूबाबत परवाना नसल्याने मारुती दत्ता कदम (वय ३४ रा. शेलगाव ता. लोहा), सचिन साहेबराव राठोड रा. आडगाव तांडा ता. लोहा, सुनील रमेश राठोड रा. बाचोटी तांडा ता. कंधार आणि संतोष देविदास राठोड रा. आडगाव तांडा ता. लोहा हे अवैध वाळूची वाहतूक करीत असल्याने त्यांच्याविरुद्ध पोलीस हवालदार गंगाधर शिंदे आणि विश्वनाथ हंबर्डे यांच्या फिर्यादीवरुन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विनानंबर वाहने व अवैध रेतीचा जप्ती पंचनामा करुन वाहने जप्त करण्यात आली आहेत.

# मोक्कातील फरार आरोपी ‘स्थागुशा’च्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि जिल्ह्यात विविध प्रकारचे गंभीर गुन्हे करून पोलिसांना चकमा देत फरार असलेल्या आरोपींना अटक करण्याच्या सूचना वरिष्ठांनी दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहराच्या म्हाळजा मालटेकडी परिसरातून एका अट्टल गुन्हेगारास व मोक्का प्रकरणात फरार असलेल्यास अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपीचे नाव सोहेल खान उर्फ चिंधी असल्याचे सांगण्यात आले.




नांदेड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी क्रॅक डाऊन ही मोहीम सुरू केली आहे. गुन्हेगार मिळाल्यानंतर त्या घटनेच्या मुळापर्यंत जाऊन गुन्ह्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशित केले. नांदेडच्या शांततेला बाधा पोहोचणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी तितक्याच ताकदीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी आपल्या सहकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांची टीम कामाला लागली. सोनकांबळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून त्यांनी विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा लावून म्हाळजा मालटेकडी परिसरात मोक्कातील फरार आरोपी सोहेल खान उर्फ चिंधी फिरोज खान पठाण याला ताब्यात घेतले. तो मागील काही वर्षापासून फरार होता. त्याची कसून चौकशी केल्यानंतर पुढील तपासासाठी त्याला विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. मिलिंद सोनकांबळे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## शालिनी उदावंत यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील शालिनी मुंजाजीराव उदावंत वय ६९ वर्षे, रा वामननगर कॅनाल रोड नांदेड यांचे दि. ०५ जून २६ रोजी सायंकाळी ५ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवार, दि. ६ जून २६ रोजी सकाळी १०:३० वाजता निघणार आहे.

त्यांच्या पश्चात पती, मुली, मुलगा, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्या मुंजाजीराव उदावंत यांच्या पत्नी व नरहरी उदावंत यांच्या आई होत.



**मुदखेड** –जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मुदखेड येथील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलचे मुख्याध्यापक तथा पर्यावरण क्षेत्रात काम करणारे विजयकुमार बेंबडे यांची महाराष्ट्र राज्य निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळावर राज्य संघटक म्हणून नियुक्ती झाली. त्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते दिगंबर क्षीरसागर आणि कवी नारायण शिंदे यांच्या उपस्थितीत शाल, पुष्पहार आणि ग्रंथ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# बापूसाहेब गजभारे यांचा वाढदिवस साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)**– आंबेडकरी चवळीतील ज्येष्ठ नेते तथा पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे प्रदेश महासचिव बापूसाहेब गजभारे यांचा वाढदिवस मोठ्या विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.

खुरगाव येथील श्रामनेर प्रशिक्षण केंद्र येथे वृक्षारोपण, रयत रुग्णालयात चादर व फळे वाटप, नेरली कुष्टधाम येथे भोजनदान आदी कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमास आमदार बालाजी कल्याणकर, भन्ते पय्याबोधी, डॉ. एस. टी. खुरसाळे, नगरसेवक प्रशांत इंगोले, सुधाकर टाक, एम. आर. जाधव, विनोद भरणे, अनिल हंकारे, संघरत्न खंदारे, महेंद्र पिंपळगावकर, गंगाधर वन्ने, सतीश पांडवे, आकाश गजभारे, महेंद्र सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते. दिवसभर अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तसेच मोबाईलवर शुभेच्छा देऊन अभीष्टचिंतन केले.

# नांदेड जिल्ह्यातील वीज ग्राहकांच्या समस्यांवर लवकरच तोडगा काढणार- अधीक्षक अभियंता

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर व जिल्ह्यात भेडसावणारी विजेची समस्या दूर करून वीज ग्राहकांना लोकाभिमुख सेवा देण्यासाठी महावितरणची यंत्रणा अधिक सक्षम करून शहर व जिल्ह्यात उघडे असलेले डीपी बॉक्स तसेच निकामी झालेले खांब, लोंबकळणाऱ्या तारा या बाबतची कामे तातडीने हाती घेणार आहेत. मोठ्या प्रमाणात ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम सुरू असल्याचे महावितरणचे नूतन अधीक्षक अभियंता संजय खंदारे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. एवढेच नाही तर नियंत्रण कक्ष (कॉल सेंटर) या विभागाच्या कामकाजातही पारदर्शकता आणून आलेल्या प्रत्येक ग्राहकांच्या कॉलला उत्तर देण्यासाठी महावितरण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

महावितरणच्या अधीक्षक अभियंता पदाचा पदभार संजय खंदारे यांनी नुकताच स्वीकारला. यावेळी त्यांनी पत्रकारांशी मनमोकळ्या गप्पा करून विजेच्या समस्या जाणून घेतल्या. सद्यःस्थितीत पावसाळा तोंडावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे वीजपुरवठा सुरळीत असावा या अनुषंगाने विजेच्या तारांना अडथळा निर्माण होणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याचे काम सुरू आहे. यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडून कोणताही अडथळा येणार नाही, यासाठी योग्य सूचना देण्यात येतील, असे अधीक्षक अभियंता संजय खंदारे यांनी सांगितले. यावेळी पत्रकारांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी जनसंपर्क अधिकारी मोहन दिवटे, कार्यकारी अभियंता (ॲडमिनिस्ट्रेशन) गाडेकर उपस्थित होते. जिल्ह्यासह नांदेड शहरातील असंख्य समस्या वीज वितरण कंपनीच्या बाबतीत असल्याचे निर्दशनास आणून दिल्यानंतर खंदारे यांनी या समस्या लवकरच सोडविल्या जातील, असे सांगितले.

सध्या नांदेड जिल्ह्यात २,१९९ एवढी मनुष्यबळ संख्या आहे. यात प्रत्यक्ष कामावर १,८५५ कर्मचारी असून, ३४४ पैकी १९५ कर्मचारी कार्यालयीन कामकाजात आहेत. १३४ जागा रिक्त असून, या जागा देखील लवकरच भरल्या जातील असेही त्यांनी सांगितले. महावितरणमधील विविध विभागाचा आढावा घेवून निर्माण झालेल्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

नांदेड शहरात सध्या नव्याने ८० नवीन ट्रान्सफार्मर बसविले जाणार आहेत. याची आम्ही मागणीही केली आहे. यापैकी ३५ उपलब्ध झाले असून ते बसविण्यातसुध्दा आले आहेत. यातील १५ ट्रान्सफार्मचे काम सुरू आहे. जवळपास शहरातील ८० ट्रान्सफार्म हे जूनच्या अखेरपर्यंत बसविले जातील असे सांगून त्यांनी नांदेडकरांना वीजेच्या समस्येपासून लवकरच मुक्त केले जाईल. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि उन्हाळ्यात वीजेची वाढती मागणी असल्याने वारंवार वीज खंडीत होणे, विद्युतपुरवठा सुरळीत करण्यासाठी होणारी धावपळ हे सर्व लक्षात घेवून आगामी काळात वीज ग्राहकांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे अधीक्षक अभियंता संजय खंदारे यांनी पत्रकारांना सांगितले.

# तालुक्यातील शासकीय डेपोमधील रेतीसाठ्याचा १९ जून रोजी जाहीर लिलाव

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार नांदेड तालुक्यातील शासकीय डेपोमधील शिल्लक रेतीसाठ्याचा जाहीर लिलाव शुक्रवार, दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, चिखलवाडी परिसर नांदेड येथील कार्यालयाचे सभागृह येथे करण्यात येणार आहे.

या लिलावात भाग घेण्यास इच्छुक व्यक्तींनी ओळखपत्रासह विहित तारखेस उपस्थित राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले आहे.

नांदेड तालुक्यातील शासकीय रेती डेपोमधील शिल्लक रेतीसाठा पुढीलप्रमाणे आहे. मौ. रहाटी, जुने वाघी ता. नांदेड ३८ हजार ७१२ उपलब्ध रेतीसाठा असून हातची किंमत २ हजार ७६७ रुपये आहे. याची हातची किंमत १० कोटी ७१ लाख १६ हजार १०४ रुपये आहे. तर खुपसरवाडी येथे १ हजार ५ उपलब्ध रेतीसाठा असून हातची किंमत प्रति ब्रास २ हजार ७६७ रुपये आहे. तर २७ लाख ८० हजार ३५ रुपये याप्रमाणे आहे.

लिलावाच्या अटी व शर्ती महसूल व वनविभागाचा ८ एप्रिल २०२५ व १५ जुलै २०२५ शासन निर्णयाप्रमाणे राहतील. या जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती उपविभागीय अधिकारी कार्यालय नांदेड व तहसील कार्यालय, नांदेड या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेल्या आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com